सांगे तालुक्यातील कोळंब आणि वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोकवाङ्मयाचा अभ्यास

एम.ए. (मराठी) पदवीसाठी सादर केलेली संशोधन प्रबंधिका

MAR-651 Discipline Specific Dissertation

मराठी अध्ययनशाखा

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

गोवा विद्यापीठ

अभ्यासक

क्रितिका गुरूनाथ नाईक

हजेरी क्र: २२P०१९००१२

ABC ID: ६०२६१३५६३८५९

पी. आर:२०१८१२२४३

मार्गदर्शक

जयेश गावकर

(सहायक प्राध्यापक)

शणै गोंयबाब भाषा आणि साहित्य महाशाळा

मराठी अध्ययनशाखा

गोवा विद्यापीठ

शैक्षणिक वर्ष 2023 – 2024

SANGE TALUKYATIL KOLAMB ANI VERLE GAVATIL KULAMI JAMATICHYA LOKVAGMAYACHA ABHYAS

Submitted in partial fulfilment of Masters Degree

MA in Marathi

MAR-651 DISCIPLINE SPECIFIC DISSERTATION

Marathi Discipline

Shenoi Goembab School of Language & Literature

Goa University

by

KRITIKA GURUNATH NAIK

Seat No: 22P01900012

ABC ID: 602613563859

PRA: 201812243

Under the supervision of

JAYESH GAONKAR

(Assistant Professor)

Marathi Discipline

Shenoi Goembab School of Language & Literature

Goa University

2023 – 2024

DECLARATION BY STUDENT

I hereby declare that the data presented in this Dissertation report entitled, **"सांगे तालुक्यातील कोळंब आणि वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोकवाङ्मयाचा अभ्यास"** is based on the results of investigations carried out by me in the Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University under the Supervision of Jayesh Gaonkar and the same has not been submitted elsewhere for the award of a degree or diploma by me. Further, I understand that Goa University or its authorities will be not be responsible for the correctness of observations/experimental or other findings given the dissertation.

I hereby authorize the University authorities to upload this dissertation on the dissertation repository or anywhere else as the UGC regulations demand and make it available to any one as needed.

KNaik

(Kritika Gurunath Naik)

Signature and Name of Student

Seat no: 22P0190012

Date: 16/04/2024

Place: Goa University

COMPLETION CERTIFICATE

This is to certify that the dissertation report "**सांगे तालुक्यातील कोळंब आणि वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोकवाङ्मयाचा अभ्यास**" is a bonafide work carried out by Ms kritika Gurunath Naik under my supervision in partial fulfilment of the requirements for the award of the degree of **Master of Arts** in the Discipline Marathi Discipline at the Shenoi Goembab School of Language & Literature, Goa University.

JAYESH GAONKAR

Date: 16/04/2024

GOA UNIVERSITY ★ TALEIGAON PLATEAU ★
SHENOI GOEMBAB SCHOOL OF LANGUAGES & LITERATURE

Signature of Dean of the School/ HOD of Dept

School/Dept Stamp

Date: 25/04/2024

Place: Goa University

‘ सांगे तालुक्यातील कोळंब आणि वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोकवाङ्ग्याचा अभ्यास’

अनुक्रमणिका

प्रकरण क्र.	प्रकरण	पृष्ठ क्र.
Declaration		
Completion Certificate		
मनोगत		
१.	प्रस्तावना	1-5
२.	लोकसाहित्य संकल्पना स्वरुप आणि व्याप्ती	6-17
३.	कोळंब व वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोककथा	18-34
४.	कोळंब व वेर्ले गावातील कुळमी जमातीचे लोकगीते	35-56
५.	कोळंब व वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोककथागीते	57-64
६.	कुळमी जमातीचे इतर संकिर्ण लोकवाङ्मय	65-77
७.	समारोप	78-79
	निष्कर्ष	80-81
परिशिष्ट		82-116
संदर्भ सूची		117-119

मनोगत

'सांगे तालुक्यातील कोळंब आणि वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोकवाङ्मयाचा अभ्यास' या विषयी गोवा विद्यापीठाच्या एम.ए मराठी पदवीसाठी प्रबंध सादर करीत असताना मला अत्यंत आनंद होत आहे. हे संशोधनं कार्य करीत असताना अनेकांची मदत मला लाभली. त्या सर्वांचे आभार मानणे माझे कर्तव्य आहे.

हा विषय निवडण्याच्या अगोदर मी लोककथा असा विषय निवडलेला पण नंतर सराशी चर्चा करून 'सांगे तालुक्यातील कोळंब आणि वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोकवाङ्मयाचा अभ्यास' हा विषय निवडण्यात आला. त्यानंतर सरांनी प्रकरणाची मांडणी कशी असेल याची चर्चा केली. प्रथम संकलन पुर्ण करायला सुचविले. लोकसाहित्याच्या संशोधनात महत्त्वाचे काम म्हणजे संकलन होय पण हे संकलन करण्यात मला अनेक जणांनी मदत केली.

या संशोधनाच्या अभ्यासासाठी अनेक ग्रंथालयांना भेटी देण्यात आल्या विशेष करून गोवा विद्यापीठ, कुडचडे सरकारी ग्रंथालय, सांगे ग्रंथालय या ग्रंथालयातील ग्रंथ संपदा माझ्या या संशोधनासाठी उपयुक्त ठरली. त्यासाठी मी या सर्व संस्थेचे मनापासून आभरी आहे. या संशोधनकार्यात सर्वात महत्त्वाचे स्नेहशील आम्हला प्रेरणा करणारे प्रो. जयेश गावकर सरांचे मी आभार मानते.

माझ्या या संशोधनकार्याला प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष ज्या ज्या व्यक्तीनी माला मार्गदर्शन, सहकार्य, प्रोत्साहन दिले त्या सर्वांचे तसेच कुंटुबीयाचे, मित्रांचे मी अत्यंत ऋणी आहे. तसेच या दोन्ही गावातली लोकांनी संकलन करत असताना खूप मदत केली त्यांचेची मी आभार मानते.

प्रकरण १

प्रस्तावना

लोकसाहित्य हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ पाश्चिमात्य देशात झाला. इंग्रज भारतात प्रथम व्यापार करण्यासाठी आले . त्यांचा हेतू राज्य स्थापन करण्याचा होता. पुढे हळू हळू त्यांनी भारतावर आपली राजसत्ता प्रस्थापित केली. पण ज्या लोकांवर राज्य करायचे त्यांना नीट समजून घेतले पाहिजे अश्या हेतूने त्यांनी येथील लोकजीवनाचा अभ्यास सुरु केला. येथील लोकसंस्कृतीचे कुतूहल म्हणून काही अभ्यासकांनी लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ केला. तसेच वेगवगळया ठिकाणाच्या गॅझेटियरच्या निर्मितीसाठी त्यांनी जेव्हा कामाचा सुरुवात केली तेव्हा त्या कामाच्या निमित्ताने लोकसाहित्याच्या अभ्यासाला गती मिळाली. भारतीय संस्कृती आणि लोकजीवन समजून घेण्यासाठी अनेक इंग्रज अधिकाऱ्यांनी लोकसाहित्याचे संकलन केले. १९८४ मध्ये विल्सन जोन्स यांच्या प्रयत्नाने कलकत्याला 'अँशियांटिक सोसायटी ऑफ बंगला' या नावाची संस्था स्थापना करण्यात आली. या संस्थेद्वारे लोकसांस्कृतिक दुष्टीने लोकसाहित्याच्या संकलनाच्या कार्याला सुरुवात झाली. तसेच ख्रिस्ती मिशनऱ्यांनी धर्म प्रसाराच्या हेतूने जिज्ञासावृत्तीने लोकसाहित्याचे संकलन केले.

मराठीत लोकसाहित्याचे संकलन, प्रकाशन भरपूर प्रमाणात झालेले आहे. शिवाय, लोकसाहित्याच्या संशोधन कार्यही बऱ्याच प्रमाणात झाले आहे. मिस फिसर यांच्या Old Decan Days या महाराष्ट्रातील लोककथांच्या संग्रहानंतर राजारामशास्त्री भागवत, विष्णुशास्त्री चिपळूणकर, काशीनाथ लेले इत्यादी मंडळांनी लोककथा आणि लोकसाहित्य संकलित करण्याचा प्रयत्न केला. मराठीत लोकसाहित्याच्या अभ्यासाची सुरुवात इतिहासाचर्य वि. का. राजवाडे यांच्यापासून झाली, त्यांनी लोकगीते,लोककथा यांची वैशिष्ट्ये सांगितली आणि सर्वप्रथम हे दोन्ही शब्द वापरले .

पुढे गोमंतकातही अनेक अभ्यासकांनी लोकसाहित्याचे संकलन आणि संशोधन केले. त्यात जयंती नायक, विनायक खेडेकर, पौर्णिमा केरकर, उल्लास प्रभुदेसाई, राजेंद्र केरकर, झीलू गावकर इत्यादींची नावे

सांगता येतात. गोमंतकामध्ये अनेक जाती जमातीचे लोक वास्तव करतात. प्रत्येक जाती-जमातीची आपली लोकसंस्कृती आहे. त्यापैकी कुळमी ही अत्यंत महत्त्वाची लोकजमात होय. या जमातीचे आपले लोकवाड़मय साभाळून ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही जमात गोव्यात आदिम जमात समजली जाते. कुळमी जमातीचे विशेष म्हणजे ही जमात स्वतःचे वेगळे अस्तित्व राखून आहे. ही जमात गोमंतकातील आद्य वसाहतकार असून शिकार करणे हा त्याचा वांशिक दर्जा आहे. गोव्यात ही जमात वेगवेगळ्या ठिकाणी पाहायला मिळते. काणकोण, सांगे, केपे अश्या वेगवेगळ्या परिसरात ही जमात सापडते. त्यांच्या लोकवाङ्म्याचा अभ्यास पुढे करायचा आहे.

संशोधन विषयक समस्या

1. सांगे तालुक्यातील कुळमी जमातीचा अभ्यास आजतागायत झालेला नाही.

2. लोकसाहित्याचे संक्रमण आज मोठ्या प्रमाणात होत नाही म्हणून लोकसाहित्याचे संकलन करून संशोधन कारणे ही काळाची गरज आहे.

3. कुळमी लोकवाड़मयातील वाड्ममीय मूल्याचा शोध घेणे आवश्यक आहे. लोकवाड़मय नष्ट झाल्यास तो शोध घेता येणार नाही .

संशोधनाची उदिष्टे

1. लोकवाङ्म्यावर झालेला आधुनिक जीवनप्रणालीचा शोध घेणे.

2. वाङ्मयीन मूल्यांचा शोध घेणे.

3. लोकवाङ्मय आणि मौखिक परंपराचे स्वरुप जाणणे.

4. लोकवाङ्मयात भाषिक अभ्यास करणे.

5) लोकवाङ्मयातून नीतिमूल्यांचा शोध घेणे.

संशोधन विषयाचे महत्व (उपयुक्तता आवश्यकता)

1. वाड्मयीन मूल्याचा शोध घेता येईल.

2. संकलन करून ते पुढच्या पिढीसाठी जपून ठेवता येईल.

3. भाषिक अभ्यास करता येईल.

4. लोकवाड्मयातून नीतिमूल्यांचा शोध घेता येईल.

गृहीतकांची मांडणी

1. लोकवाङ्मयात वाङ्मयीन मूल्ये दडलेली आहे.

2. लोकवाङ्मयातून निसर्गाचे दर्शन घडते.

३. स्व जातीचा अभिमान दिसतो.

4. मौखिक परंपरा आणि लोकवाङ्मय वैशिष्टपूर्ण असून ते स्थानिक वैशिष्ट्यांनी नटलेले आहे.

5. सांगे तालुक्यातील निसर्ग आणि भौगोलिकता यांचा लोकवाङ्मय आणि भौतिक संस्कृताशी संबंध आहे.

6. बदलेल्या जीवनशैलीचा प्रभाव लोकवाङ्मयावर पडलेला आहे.

संशोधन पद्धती

1. क्षेत्रीय अभ्यास पद्धती

सांगे परिसरातील कुळमी जमातीच्या लोकवाङ्ग्याचा अभ्यास इथे अभिप्रेत असल्याने प्रामुख्याने क्षेत्रीय अभ्यास पद्धतीचा वापर केलेला आहे. लोकवाड्मयाचा अभ्यास फक्त ग्रंथालयात बसुन करणे शक्य नाही यासाठी क्षेत्रीय अभ्यास हा महत्वाचा ठरतो. प्रत्यक्ष भेटी, मुलाखती, सहभागी होऊन संकलन आणि संशोधन केले जाणार आहे.

2. वर्णनात्मक पद्धती

या पद्धतीने विशिष्ट काळातील माहिती फार मोठ्या प्रमाणात संकलित करता येते. ही माहिती प्रश्नावली, मुलाखत या सारख्या साधनाचा उपयोग करून कमी वेळेत संकलित करता येते. वर्णनात्मक सर्वेक्षण हे गुणात्मक असते. लोककथांचे संकलन करून लोक समाजातील मिळालेल्या माहितीची शास्त्रीय निकषावर आधारलेली वर्गवारी करून, विश्लेषण आणि चिकित्सा वर्णनात्मक स्वरूपात संशोधना द्वारे होईल .

प्रकरणाची मांडणी

प्रकरण 1. लोकसाहित्य: संकल्पना: स्वरुप आणि व्याप्ती

प्रकरण 2. सांगे तालुक्यातील कुळमी जमातीच्या लोककथा

प्रकरण 3. सांगे तालुक्यातील कुळमी जमातीच्या लोकगीते

प्रकरण 4. सांगे तालुक्यातील कुळमी जमातीच्या लोककथागीतेप्रकरण

प्रकरण 5. कुळमी जमातीचे इतर संकिर्न लोकवाङ्मय

समारोप

सांगे तालुक्यातील कोळंब आणि वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोक वाङ्मयाचा या विषयाच्या अंतर्गत कोळंब आणि वेर्ले गावातील लोक वाङ्मयाचा अभ्यास होणार आहे त्यांची लोकगीते, म्हणी लोककथा याचा अभ्यास होणार आहे.

प्रकरण २

लोकसाहित्य संकल्पना स्वरुप आणि व्याप्ती

प्रास्ताविक 7

२.१ लोकसाहित्य म्हणजे काय? 7

२.२ लोकसाहित्याची संकल्पना 8

२.२.१ लोक ची संकल्पना 9

२.२.२ साहित्य शब्दाचा अर्थ 10

२.३ लोकसाहित्याच्या व्याख्या 10

२.४ लोकसाहित्याचे स्वरुप 12

२.५ लोकवाङ्मय 13

२.६ लोकसाहित्याची व्याप्ती 13

२.७ समारोप 15

२.८ निष्कर्ष 15

संदर्भसुची 17

लोकसाहित्य संकल्पना स्वरुप आणि व्याप्ती

प्रास्ताविक

'लोकसाहित्य' या विषयाला भारत देशातच नव्हे तर जगामध्ये महत्व प्राप्त होऊ लागलेला आहे. जेव्हा वेगवेळ्या यंत्राची निर्मिती झाली.तेव्हा मौखिक परंपरेने चालत आलेल्या लोकसाहित्याचे संकलन आणि मुद्रण मोठ्या प्रमाणात होऊ लागले. पारंपरिक लोक साहित्याचा अभ्यास संस्कृतीचा शोधा घेण्यासाठी होऊ लागला. 'folklore'या शब्दासाठी मराठीत 'लोकसाहित्य' हा पर्यायी शब्द म्हणून रूढ झाला. 'लोक' व 'साहित्य' अशी दोन वेगवेगळी पदे मिळुन हा शब्द तयार झलेला आहे. परंपरेने जे चालत आलेल्या लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे अशा मौखिक साहित्याचा समावेश लोकवाङ्म्यात केला जातो. लोकसाहित्य म्हणजे जे लोकजीवनात परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेल्या कथा,म्हणी या सगळयाचा समावेश होतोच. याचबरोबर परंपरेने चालत आलेले चित्र,नृत्य ,संगीत यासारख्या सर्व कला या सगळयाचा लोकसाहित्यात समाविष्ट होतो.चालीरीती,रूढी ,उत्सव,विधी या सर्वांना मिळून लोकसाहित्य हा शब्द वापरला जातो.

२.१ लोकसाहित्य म्हणजे काय?

लोकसाहित्य हे मौखिक स्वरूपात एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असते. त्यांचा कर्ता हा अनामिक असतो. इंग्रजी राजवटीत जे परदेशी लोक भारतात आले त्यांनी भारतात येऊन लोकसाहित्याचे संकलन केले, तसेच आपल्या देशातही लोकसाहित्याचे संकलन केले. लोकसाहित्याचा अभ्यास करत असताना लोकजीवनविषयी समजून घेणे महत्त्वाचे आहे. लोकसाहित्याची निर्मिती ही एका व्यक्तीपूर्ती मर्यादित नसते. लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीतून घडलेला आविष्कार असून लोकजीवनाचा गंध त्याला असतो. लोक ही संज्ञा मुळात ग्रामीण जीवन जगत असलेल्याच लोकांसाठी नसून ती इतर लोक समूहाची असते. लोकसाहित्याची निर्मिती ही समुहनिष्ठ असते. समूहाच्या एकत्रीकरणातून लोकसाहित्य निर्माण होत असते. लोकसाहित्याचा कर्ता हा अज्ञात असतो.

लोकसाहित्याच्या सहवासातून लोकमानसाचा जन्म होतो, लोक परंपरा, लोक रुढी, लोक विश्वास, लोकविधी, लोकनाट्य, विधीनाट्य, इत्यादी यामधून लोकसाहित्यातील लोकमानस व्यक्त होतो. तसे पाहायला गेले तर लोकसाहित्य ही लोकांची जीवन जगण्याची पद्धतच असते आणि ती पूर्वापार चालत आलेली असते. लोकजीवन परिवर्तनाच्या ओघात ती बदलत असते. तसेच आपल्या समाज जीवनाला वेगळं वळण देण्याचे कामही लोकसाहित्य करत असते. 'लोकसमुहतील घटक व्यक्तीचे परस्परांतील भावसंबंध कायम रहातात. चिंता, भय, आनंद हे भाव एकत्रितपणे अनुभवले जातात आणि व्यक्त केले जातात. त्यामुळे व्यक्तीची एका अर्थाने मानसिक व भावनिक गरज भागविली जाते.' असे प्रभाकर मांडे आपले मत मांडतात. लोकजीवनाच्या आधाराशिवाय लोकसाहित्य जिवंत राहूच शकत नाही. लोकसाहित्य हाच लोकांचा आत्मा असतो. आणि लोकसाहित्य हे स्वतंत्र अभ्यासक्षेत्र ठरते. लोकसाहित्य हे एका पिढीपासून दुसऱ्या पिढीला पोहचवण्याचे कार्य करते. तसेच लोकसाहित्याला आपण बोध व शिक्षण देण्याचे एक उत्तम साधन म्हणूनही पाहु शकतो.

२.२ लोकसाहित्याची संकल्पना

"लोकसाहित्य हे लोकांच्या जगण्यातून प्रकट होत असते. सर्वसामान्य लोकांचे साहित्य म्हणजे लोकसाहित्य लोकजीवनामध्ये ज्या गोष्टी परंपरेने चालत आलेल्या आहेत. ज्यामध्ये विविध धार्मिक विधीचा समावेश तसेच लोकसमजुती अनेक रूढी समावल्या जातात. लोकसाहित्य हे सहजपणे निर्माण होत असते. ते सर्व लोकांचे असल्यामुळे त्याचा एकच निर्माता नसतो. लोकाकडूनच निर्मिती होत असल्यामुळे लोकांनाच त्या लोकसाहित्याचे जनक असे म्हटले जाते . त्याचे सक्रमण एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे सातत्याने व परंपरेने होत असते. लोकसाहित्य हे लोक जीवनाचे जीवनाविष्कार घडविणारे एक महत्त्वपूर्ण असे अंग आहे".[१]

आपण लिखित किंव्हा मुद्रित साहित्याला जेवढा महत्त्व देतो. तेवढेच मौखिक साहित्याला दिले पाहिजे पिढ्यान पिढ्या चालत आलेली मौखिक परंपरेला घेवून आपण पुढे गेलो पाहिजे. ग्रामीण भागातून लोकांनी

आपली दैनंदिन जीवन, संस्कृती, लोकमन यांच्या संयोगाने या साहित्याची निर्मिती केली असते. ‘लोकसाहित्य हा मुळात ‘cultural anthropology’ सांस्कृतिक मानवशास्त्र म्हणुन ओळखला जातो. १७ व्या शतकात लोकसाहित्य अभ्यासाला सुरुवात झाली तरी १८४६ मध्ये विल्यम जॉन थॉमस याने लोकसाहित्याच्या सामाग्रीला सर्वप्रथम ‘folklore’ ही संज्ञा वापरली. याआधी या संज्ञेला ‘popular antiquities’ म्हटले जायचे. पुरातत्वीयशास्त्राचा अभ्यास समग्रीसाठी केला जायचा. पाश्चिमात्य देशांत सर्वात आधी ‘folklore’ ही संकल्पना मानवशास्त्र व समाजशास्त्र या दोन शाखांमधून आली. जागतिक पातळीवर इंग्लंडमध्ये ‘folklore society’ उदयास आली आणि लोकसाहित्य अभ्यासाला चालना मिळाली. भारतात लोकसाहित्य विषयी चर्चा साधारणतः १८५० नंतर सुरू झाली. राजारामशास्त्री भागवतांनी शास्त्रीय दृष्टिकोन समोर ठेवून लेखन केले निबांधमालेत लोकसाहित्याला विशेष स्थान विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी दिले नंतर विसाव्या शतकात दुर्गा भागवत, वि. का. राजवाडे, ना. गो. चाफेकर, प्रभाकर मांडे, नामदेव व्हरटकर, गंगाधर मोरजे, इत्यादि अभ्यासकांनी लोकसाहित्याचा वेध घेतला. इंग्रजीतील ‘folklore’ या शब्दासाठी मराठीत लोकसाहित्य हा शब्द वापरला जातो ‘folk’ शब्दासाठी लोक आणि ‘lore’ या शब्दासाठी साहित्य अश्या दोन शब्दांच्या एकत्रीकारणातून लोकसाहित्य असा शब्द आलेला आहे. हिंदीमध्ये ‘folklore’ साठी लोकवार्ता हा शब्द वापरण्यात आला. दत्तो वामन पोतदार यांनी ‘folklore’ साठी त्याचे भाषांतर म्हणून लोकविद्या हा शब्द सुचविला पण हा शब्द तितका रूढ झाला नाही. नंतर दुर्गा भागवत यांनी लोकसाहित्य हा शब्द सुचविला आणि तो रुढही झाला’.[२]

२.२.१ लोक ची संकल्पना

मानवाची पारंपरिक जीवन पद्धती लोकमानसाच्या कृती उक्ती म्हणजे लोकसाहित्य असे म्हणता येते. लोकसाहित्याला इंग्रजीत Folklore असे म्हंटले जाते.folk हा शब्द लोक या शब्दासाठी वापरला आहे. लोक म्हणजे जनसमुदाय निसर्गाशी जवळ असताना एक संस्कृती व परंपरा संस्कृती संदर्भात असलेला

समाज म्हणजे लोक. शहरी संस्कृती पासून दूर असलेला स्वाभाविक जीवन जगणारा जनसमुदाय म्हणजे लोक असे काही अभ्यासकांनी म्हटले आहे. लोक हा शब्द अर्थ जटानी भरलेला आहे. आदीम जीवनाशी जवळ असलेला स्वतंत्र अस्तित्व असलेला पारंपरिक जीवन जगणारा तो स्वतःची संस्कृति परंपरा आणि समूह भावनांनी एकवटलेल समाज म्हणजे लोक.

२.२.२ साहित्य शब्दाचा अर्थ

Folklore मधील lore या पदास 'साहित्य' असे म्हणतात. साहित्य हा शब्द दैनंदिन जीवनात व्यापक अर्थाने वापरण्यात येतो. त्याबरोबरच कथा, कविता, नाटक, कादंबरी यासारख्या ललित साहित्यासाठी मराठीत 'साहित्य' हाच शब्द वापरण्यात येतो. लोकसाहित्यातील साहित्य म्हणजे वाङ्मय या बरोबर साधन सामुग्री हा साहित्याचा अर्थ होतो. परंपरेने लोकजीवन लोकजीवनात प्रचीलत असलेल्या बाबी त्या भौतिक स्वरूपाच्या शापदीक अविष्काराच्या किंवा सांस्कृतिक त्या लोकसाहित्याच्या कशेमध्ये येत असतात म्हणून लोकसाहित्यातील लोक आणि साहित्य या दोन्ही शब्दाला एक स्वंतत्र विशिष्ट असा प्रकार असतो.

२.३ लोकसाहित्याच्या व्याख्या

पश्चात अभ्यासकांच्या व्याख्या

- मारियस बार्डी

"मारियस बार्डी यांनी लोकसाहित्याची संकल्पना स्पष्ट करताना त्याची व्यापकता दर्शविली आहे. विविध व्यवसायांचे ज्ञान, अनुभूती , शहाणपण, कौशल्य, सवयी आणि रुढी तसेच व्यवहार यासंबंधीचे ज्ञान शब्दाने किंवा कृतीने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत येते. त्या सर्वांस लोकसाहित्य म्हणावे."[३]

➢ आर्चर टायलर

“लोकसीहत्य एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होते. त्याचा निर्माता आज्ञात असतो. त्याची निर्मिती कुणीतरी एक व्यक्तीकडून झालेली असली तरी निश्चितपणे त्या व्यक्तीचे नाव सांगता येत नाही. त्या रचनेचे स्वरूपही बदलते”.[४]

➢ गास्टर

“गास्टर यांच्या मते, लोकसाहित्य हे लोकांच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक असून तो लोकांकडून विचारपूर्वक किंवा अजाणता संरक्षिला जातो लोकासाहित्य हे लौकिक परंपरांचा निधी असते. लोकजीवनाचा सर्वसंग्राहक असा तो घटक असतो. लोकसाहित्य हे कला व वाङ्गय यांचा स्रोत असतो. ते लोकांचे, लोकांनी निर्माण असते. त्यातून लोकांची प्रकृती आणि सर्जनक्षमता प्रकट होते. त्याचप्रमाणे त्यात व्यक्तिविशिष्टत्व नसते, तर समूहनिर्मित सर्जनक्षमता प्रभावी असते”.[५]

➢ विलियम वॅस्कम

या अभ्यासकाने लोकसाहित्याला एक कलाप्रकार मानले आहे. त्यांच्या मते “मिथ्या, म्हणी, लोकगीते, यासारखे कलात्मक आविष्कार म्हणजे लोकसाहित्य.” याचाच अर्थ असा की, भाषेच्या माध्यमातून मौखिक रूपातील शब्दाविष्करातून अभिव्यक्त होणाऱ्या पारंपरिक कलात्मक आविष्काराना बॅस्कम लोकसाहित्य म्हणतात.[६]

भारतीय अभ्यासकांच्या व्याख्या

➢ प्रभाकर मांडे

“लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजे लोकसाहित्य असते. लोकसाहित्य लोकांचे असते, व्यक्तींचे कधीही नसते.”[७]

- गंगाधर मोरजे

  "लोकसाहित्य हे केवळ मौखिक स्वरूपात परंपरेने चालत आलेला वाडमयप्रकार नाही. उलट मौखिक आशय विधिसंबंधित कृती व अभिनय त्यांच्या व्दारे सादर केलेला तो प्रयोग असतो. तो प्रयोग श्राव्य व दृश्य असतो."[८]

- दुर्गा भागवत

  "लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीचा अभिसरणाचा अभ्यास आहे. संस्कृतीचे सातत्य आणि तिच्यात होणारे बदल यांचे निरिक्षण करायचे तर ते लोकसाहित्यातच करावे. मानव व त्यांच्या सभोवारची चराचर सृष्टी हिचे नाते लोकसाहित्याच्या अभ्यासा नंतर विशेष लक्षात येते."[९]

- चि. ग कर्वे

  पुरातन काळापासून चालत आलेले व बहुदा तोंडी असलेले वाङ्मय, गाणी, कोडी, म्हणी यांना लोकसाहित्य असे म्हणता येईल.[१०]

२.४ लोकसाहित्याचे स्वरुप

एखादया लोकसमाजाचे आचार विचार रुढी ,प्रथा, परंपरा, संगीत, नृत्य इत्यादि पारंपरिक माध्यमातून अभिव्यक्त होत. तेव्हा या माध्यमांना लोकसाहित्याच स्वरुप प्राप्त होत.लोकसाहित्य व लोकजीवन यांच्यात एक अतूट प्रकारच बंधन असत. लोकसाहित्याच्या जडणघडणेत लोकजिवनाचा महत्वाचा वाटा असतो. लोकजीवनाला आकर देण्यात लोकसाहित्याचा हात असतो. दोघांचा परस्परावर संबंध आहे. पारंपरिक लोकजीवन पद्धति म्हणजे लोकसाहित्य अस म्हंटल जात. परंपरा साधत्यामुळे प्राचीन संस्कृतीची प्राचीन साहित्याचे अवशेष पुढच्या पिढी पर्यंत जातात.पशुपुज्या, प्राणीपुज्या लोकदेवताची पुज्या हा परंपरेचा वारसा असतो.

लोकसाहित्याची निर्मिती ही समूहाची निर्मिती असते. लोकसाहित्याची मिर्मिती ही लोकांच्या जगण्यातून स्वाभाविकपणेच होत असते. लोकजीवनाचा व लोकसंस्कृतीचा आविष्कार घडतो.

लोकसाहित्याच्या निर्मितीमागे लोकमानस असते. लोकसाहित्य हे भौतिक तसेच मनोमय स्वरूपाचे असते. लोकसाहित्यात पारंपारिक ज्ञान असते अनेक ज्ञानशाखा, कला व वाङ्मय यांचे मूलस्रोत लोकसाहित्यात असतात एकूणच लोकजीवनाला व्यापणारे असून त्यात समाजजीवनाचा इतिहास नोदविलेला असतो.

लोकसाहित्य हे दोन स्वरूपात आढळून येते शाब्दसामग्री व शाब्देतर सामग्री. शाब्दसामग्री म्हणजे लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, वाक्यप्रचार याचा समावेश होत असतो तर शब्देतर सामग्रीमध्ये सण, रुढी, परंपरा, कला, इत्यादीचा समावेश या साहित्यात होतो.

२.५ लोकवाङ्मय

"लोकवाङ्मय हा लोकसाहित्याचा एक मोठा भाग आहे. परंपरागत लोकजीवनाचा एक नैर्सगिक भाग म्हणून लोकजीवनात लोकवाङ्मयाला अतिशय महत्व आहे. लोकमनाचा आपोआप झालेला अविष्कार लोकवाङ्मयात पाहायला मिळतो. लोकजीवनातील असे अनेक घटक ही लोकवाङ्मयाशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या संबधित असतात .त्यातूनच त्याला आकार येत राहतो. एकूणच लोकजीवनात जगण्याच्या पद्धतीचा प्रभाव लोकवाङ्मयावर पडत असतो.

लोकवाङ्मय आणि लोकजीवन यांच्यात अतुट नाते असल्याचे आपणास पाहावयास मिळते. लोकवाङ्मय हे लोकांनी निर्माण केलेले असते ते मौखिक परंपरेने चालत आलेले असते. लोकवाङ्मयाची भाषा ही लोक बोलीभाषा असते. लोकजीवन जगताना, दैनंदिनकाम करताना, मनोरंजनासाठी, सण उत्सव साजरे करताना लोकवाङ्मयाची निर्मिती होत असते. यातुन लोकांच्या भावना व्यक्त झालेल्या पाहावयास मिळतात. लोकांच्या परंपरेने चालत आलेले जे वाङ्मय आहे तेच लोकवाङ्मय असे म्हणता येईल".[११]

२.६ लोकसाहित्याची व्याप्ती

लोकसाहित्यत कोणकोणत्या बाबीचा समावेश होतो. पारंपारिक लोकजीवनाच्या सर्व माध्यमातून होणाऱ्या अविष्काराचा समावेश सर्व माध्यमातून शापदीक किंवा कृतीयुक्त अशा पारंपारिक लोकजीवनाचा

सर्व माध्यमांतून होणाऱ्या अविष्काराचा समावेश लोकसाहित्यात होत असल्याने त्याची व्याप्ती एकूणच पारंपारिक लोकजीवनाला व्यापणारी आहे. एकूणच पारंपारिक लोकजीवनामध्ये जे जे काही आहे. त्या सगळयाचा समावेश लोकसाहित्यातून होत असल्यान त्याची जी व्याप्ती आहे. ती संपुर्ण लोकजीवनाला व्यापणारी आहे.

या व्याप्तीमुळे लोकसाहित्याची परंपरा ही किती व्यापक आहे हे लक्षात येते.लोकसाहित्याचा संबंध लोकजिवनाशी असल्यामुळे ज्या भाषेत व्यवहार केला जातो. त्याच भाषेत त्याची निर्मिति होत असते. लोकसाहित्यात चालत आलेल्या लोकजीवनाच्या चार भागातून सामावेश होतो.

- मौखिक आविष्कार

  मौखिक आविष्काराला शापद आविष्कार किंवा लोकवाङ्मय असे ही म्हणतात. या मौखिक आविष्कारामध्ये पारंपारिक लोकजीवनाचा मौखिक आविष्कार असतो. याच्यामध्ये लोककथा , लोकगीत, लोककथागीत, म्हणी, उखाणे इत्यादीचा समावेश होतो. लोकजीवनाचा बराच भाग हा मौखिक आविष्काराने व्यापलेला आहे.

- भौतिक संस्कृती

  भौतिक संस्कृतीमध्ये परंपरेने चालत आलेले व्यवसायिक ज्ञान, कौशल्ये, कला इत्यादिया समावेश होतो. प्राचीन काळामध्ये वेगवेगळे कलाकार कारागीर होते त्याची कला ही पारपारिक होती. कुंभार, सुतार, लोहार, सोनार तसेच वेशभूषा, खानपान , घराची रचना यांचा समावेश भौतिक संस्कृतीमध्ये होतो.

- लोकरूढी, विधी, समजृती इत्यादी

  लोकरूढी, विधी, समजुती, श्रद्धा या लोकांच्या मनात असलेल्या कल्पना किंवा भावना आहे. लोकांच्या मानिसकतेशी संबंधीत अश्या प्रकाराची संस्कृती पारंपारिक लोकमानसातून त्यांचा

आविष्कार होतो. उदा: दुष्ट काढणे, नवस, जादूतोणा, श्रद्धा – अंद्धक्षध्या या प्रत्येक लोकसमूहा असतात.

- प्रयोगसिद्ध लोककला

  लोकसाहित्याच्या या विभागात परंपरेने लोकजीवनात होणाऱ्या लोककलांचा समावेश होतो. लोकजीवनात विधीच्या निमित्ताने होणारी लोकनृत्य, खेळ म्हणून खेळले जाणारे नृत्य तसेच मनोरंजनासाठी केली जाणारी लोकनाट्य, लोकसंगीत, घरापुढील रांगोळी, नागपंचमी.अशा प्रसंगाच्या निमित्ताने होणारे सर्व प्रयोगसिद्ध लोककला असून या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो. प्रयोगसिद्ध लोककलामध्ये प्रत्यक्ष सादरीकरण केले जाते.

२.७ समारोप

एकंदरीत लोकसाहित्य म्हणजे पिढ्यानपिढ्या चालत आलेले मौखिक साहित्य होय. जे लिखित स्वरूपात नसते. या लोकसाहित्यांमध्ये निसर्गाचा गाव गाड्यांचा संबंध आलेला दिसून येतो. लोकसाहित्यांमध्ये लोककथा, लोकनाट्य,लोकगीते, वाक्प्रचार यांचा समावेश असतो. लोकसाहित्य हा शब्द लोक आणि साहित्य या दोन पदापासून बनला असतो.

२.८ निष्कर्ष

१. लोकसाहित्यातुन लोकजीवनाचे दर्शन घडते.

२. लोकसाहित्य हा शब्द लोक आणि साहित्य या दोन पदापासून बनला आहे.

३. लोकसाहित्य हे एकट्याचे नसून सर्व लोकांचे असते.

४. लोकसाहित्यात समूह मनाची निर्मिति असते.

५. लोकसाहित्याचा कर्ता अनामिक असतो.

६. लोकसाहित्यातुन प्रकट होत असलेल्या पारंपरिक आचार विचार दुसऱ्या पिढीपर्यंत पोहचविणे महत्वाचे आहे.

संदर्भसुची

१. वसईकर. ज्योनस व्हेलेंटाईन "वसई परिसरातील कोळी समाजाचे लोकसाहित्य एक चिकित्सक अभ्यास", मराठी विभाग मुंबई विद्यापीठ रानडे भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८ पृ क्र.6

२. मांडे, प्रभाकर. " लोकसाहित्याचे स्वरुप." गोदावरी प्रकाशन औरंगाबाद,२०१७ पृ क्र.136,139

३. शिवाजी वद्यापीठ "लोकसाहित्य व लोककला"- एम. ए . भाग १ मराठी, कोल्हापूर पृ क्र.३

४. तत्रैव पृ क्र ३

५. तत्रैव पृ क्र ६

६. तत्रैव पृ क्र ५

७. तत्रैव पृ क्र ७

८. तत्रैव पृ क्र ७

९. तत्रैव पृ क्र ७

१०. तत्रैव पृ क्र ८

११. स्त्रियांच्या कहाण्या: रूपबंधात्मक अभ्यास पृ क्र.11

१२.भागवत, दुर्गा. "लोकसाहित्याची रूपरेखा" वरदा बुक्स सेनापती बाबर मार्ग पुणे११, प्रथम आवृत्ती १९५६.

……….…………………xxxxxxxxxxxxxx……….…………………

प्रकरण ३

कोळंब व वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोककथा

प्रास्ताविक 19

३.१ कोळंब आणि वेर्ले गावाचा परिचय 20

३.२ लोककथांचे स्वरुप 21

३.३ लोककथांचे प्रकार 22

३.४ लोककथांचे विश्लेषण 25

३.५ समारोप 33

३.६ निष्कर्ष 33

संदर्भ सूची 34

कोळंब व वेर्ले गावातील कुळमी जमातीच्या लोककथा

प्रास्ताविक

लोककथा हा लोकजीवनातील सर्वात लोकप्रिय असा लोकवाङ्मय प्रकार आहे. लोकगीताना जितके महत्त्व आहे. तितकेच लोककथांनासुद्धा आहे. लहानमुलापासून ते मोठ्यापर्यंत सर्वांनाच कथा, गोष्टी ऐकायला आवडत असतात. माणूस हा गोष्टीप्रिय असून त्याला गोष्टी ऐकण्यात किंवा गोष्टी सांगण्यात आनंद होत असतो. यातच त्यांना खरी मनःशांती प्राप्त होत असते. जसा जसा मानवाच्या मनाचा विकास होऊ लागला. तसा तसा लोककथांचा विकास होऊ लागला. लोककथा नाही असा एकही समाज नाही. प्रत्येक समाजात लोककथा असल्याचे दिसून येतात. जेथे माणूस आहे. तेथे लोककथा ह्या आढळतातच. लोककथा नसणारा असा एकही समाज मिळणार नाही. लोककथांचे माणसाशी अतूट नाते असल्याचे मानले जाते. लोककथांना एखाद्या जमातीचे, धर्माचे, संस्कृतीचे किंवा काळाचे बंधन असू शकत नाही. लोककथा मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जात असतात. लोककथामध्ये विशिष्ट काही हेतू दडलेला असतो. अद्भुतता बोध या प्रयोजनासाठी लोककथा लोकामध्ये सांगितल्या जातात.

लोककथा केवळ लहानमुलासाठी असतात असे नसून या कथांचा आस्वाद वयस्कर लोकसुद्धा घेताना दिसतात. लोककथा प्राचीन काळापासून अस्तित्वात असून आजी, आजोबा संध्याकाळची किंवा झोपण्याच्यावेळी आपल्या घरातील लहानमुलांना गोष्ट सांगत असतात किंवा मुले त्यांना विनंती करतांना दिसून येतात. कथा या त्यांना समजेल अशा भाषेत सांगण्यात येतात.लोककथा या एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात जात असतात. तेव्हा त्या लोककथांमध्ये त्या प्रदेशातील संस्कृतीचा प्रभाव पडतो. त्या प्रदेशातील विविध घटकाची त्या लोककथांमध्ये भर पडते. त्यामुळे या लोककथाच्या मूळ रूपात बदल होतो. त्या लोककथा नवीन रूप धारण करीत असतात म्हणजेच लोककथाचा विकास होत असतो. लोककथांचा जन्म हा अतिप्राचीन काळात झालेला असून मानवी मनाला त्यांचे प्रचंड आकर्षण होत आहे. मानवाने जिथे जिथे प्रवास केला तेथे लोक कथाही पोहोचले .

लोककथेची भाषा साधी व सरळ असते. ती प्रत्येक लोकजमातीतील व्यक्तीला आकर्षित करत असल्यामुळे ती कोणा एकट्याची राहत नाही तर ती लोककथा सर्वांची बनते आपलेपणाची भावना ती अनामिकपणे निर्माण करते.

३.१ कोळंब आणि वेर्ले गावाचा परिचय

गोव्यात सांगे तालुका हा सर्वात मोठा तालुका म्हणून ओळखला जातो. प्राचिनकाळापासून 'संगमपुर' या नावाने तो ओळखला जायचा. पूर्व उत्तर दिशेला नदी व दक्षिण- पश्चिमेला नदी याच्या संगमस्थानी वसलेला म्हणून 'संगमपुर'असे त्यांचे नामकरण झाले होते. काळाच्या ओघात संगमपुरचे 'सांगे' असे छोटे सुटसुटीत नामांतर झाले.

गोव्याची संस्कृती ही अद्भुत रम्यतेने नटलेली आहे. त्यात सांगे या तालुक्यामध्ये वसलेल्या रिव्होनाच्या दशिणेस अवघ्या ३ कि.मी कोळंब गाव आहे. गोव्यातील इतर गावाप्रमाणेच कोळंब हा गाव ही शांतादुर्गा देवीला समरप्रित असलेल्या प्राचिन मंदिराचे घर आहे. तसेच या गावात सातेरी, ब्रह्मदेव, गणपति रामनाथ अशी लघु मंदिरे आहेत. या गावात वेळीप (देवळी) आहे ते या गावचे कारभार सांभाळतात. कोणत्याही कार्यात त्यांना पहिला मान दिला जातो. त्या गावात लोकसंस्कृती, लोकवाङ्मय अजूनही त्या गावच्या लोकांनी जपून ठेवलेला आहे. या गावात रामनवमी, दसरा इत्यादी सण मोठ्या प्रमाणात या गावाचे लोक पार पाडताना दिसून येतात.

'तसेच कोळंबहून वेर्ले हा गाव २९कि.मी आहे. एक दोन वेळीप घराणी दहाव्या शतकात कोळंबहून वेर्लेला गेली त्यामूळे त्या गावातील सातेरी देवीला कोळंबची सातेरी मानून पुजू लागले. अष्टग्रहर महालाची पर्वतरांग सीमा जिथून सुरू होते तीच्या टोकावर घरे आहे. कुळमि वेळीप जमातीबरोबच या गावात भट – देवळी आढळतात एकूण सात उपगाव असलेला हा वेर्ले गाव आहे. पावलोपावली आढळणाऱ्या इथल्या झऱ्या त्यांच्या अमृत तोयावर पिकणारी रबी शेती, माड, काजू, पोफळी इत्यादी. सहयाद्रीच्या रांगेतील

शिखरावर वसलेला हा गाव आहे. या गावाचे ग्रामदैवत म्हणजे रामनाथ – पाईक होय. सुताची पुनव ही इथली श्रावणातली मुख्य परब वर्षातून एकदा घरातील प्रत्येक पुरुषव्यक्ती जानवे घालून शंकराची पुजा करताना दिसते. तर नव्यांच्या पंचमी दिनी वेळीप 'नवी' कापून प्रथम मंदिरात मग भाविक आपापल्या देवघरात व तुळशी वृंदावनी नवी उभारतात.'[१]

वरील प्रभू देसाई यांनी मांडलेल्या उताऱ्यातून वेर्ले गावची माहिती आलेल्या असून वर्तमान स्थितीत वेर्ले गावाचा कायापालट झालेल्या दिसून येतो. तसेच वेर्ले गाव पर्यटन व कृषी क्षेत्रात झपाट्याने प्रगती करताना दिसतो. गावात हंगामी शेती लागवडी बरोबरच तसेच स्ट्रॉबेरी ची लागवड तिथे दिसते. गावातील सण उत्सव करताना दिसतात . गावातील लोक अनेक सण साजरे करतात एक गुढीपाडवा, नागपंचमी, नारळी पौर्णिमा, नया पंचम त्याचबरोबर पिंडीकोत्सव ,दसरा, सिगमा, गणेश चतुर्थी, दिवाळी यासारखे सणही साजरे होतात खास करून जसा मलकरणे गावात शनि उजव होतो. त्याच्याच साम्य जाणारा असा उजाची जत्रा हा वेर्लेचा आकर्षणाचा उत्सव असतो. पहिले गावातील देव कृत्याची सर्व जबाबदारी वेळप कडून होते.

३.२ लोककथांचे स्वरुप

लोककथांचे स्वरूप अभ्यासत असताना या लोककथांमध्ये अनेक प्रकार असल्याचे दिसून येतात. या लोककथांमध्ये समाजमनाचा समावेश झाल्याचे दिसत असून त्यात केवळ समाजमन समाविष्ट असते असे नसून, समाजजीवनाचासुद्धा त्यात समावेश झाल्याचे दिसून येते. वास्तविक लोककथेत असलेल्या प्रेरणा या लोकमनाच्या, लोकजीवनाच्या प्रेरणा असतात. लोककथांतून समाजजीवन आदर्श बनावे अशी अपेक्षा असते. "लोककथांना मौखिक परंपरा असल्यामुळे व या लोककथा एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी संक्रमित होत असताना त्यात बदल घडत असतो. कोणत्याही व्यक्तीला आपल्या मतानुसार त्यात बदल करण्याची संधी असते. बदल घडवून आणण्याचे त्या व्यक्तीवर बंधन नसते. त्यामुळे मूळ कथेत ज्या व्यक्तीने सांगितले व त्या कथेमध्ये त्या व्यक्तीने जी संकल्पना मांडली असेल, त्यात अजून भर घालून व त्या लोककथेमध्ये आवश्यक त्या घटनांचा समावेश करून, ती अधिक परिणामकारक शैलीने सांगण्याचा प्रयत्न

केला जातो. जे काही सांगावयाचे आहे त्याची रचना स्वतःच्या कल्पनाशक्तीच्या जोराने करून ती सांगणे म्हणजे लोककथा होय.

लोककथा या परंपरेनुसार मौखिकतेच्या माध्यमातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतात. हे हस्तांतरण सातत्याने चालू असते. लोककथांमधील असलेला आशय हा उपदेश देण्याचा असून, त्या उपदेशात विविध घटना व प्रसंगांचे वर्णन असते. ज्या प्रकारचा विषय असेल त्या प्रकारचा उपदेश लोककथेत दिसून येतो. लोककथांचे स्वरूप हे स्थळ व काळानुसार बदलत नसते, तर विषयानुसार त्याचे स्वरूप ठरत असते. लोककथांमध्ये बोलीभाषेचा वापर होत असल्यामुळे त्या लोककथा लोकजीवनाला स्पर्शशून जातात. भिन्नभिन्न शैलींमुळे लोककथांचे स्वरूपही भिन्न जाणवते. लोककथा या लोकजीवनाच्या भाषांतून निर्माण होत असल्यामुळे या कथा अंतर्मनाचा शोध घेतात.

भारतीय लोककथेची परंपरा अतिप्राचीन आहे. ही परंपरा अत्यंत समृद्ध व संपन्न आहे. वास्तविक लोककथेकडे प्राचीन काळापासून धार्मिक भावनेतून पाहिले जाते. सामान्य लोकांना कथेच्या माध्यमातून धार्मिक ज्ञान देणे व त्याचबरोबर ऐतिहासिक व इतर विविध प्रकारचे ज्ञान देण्यासाठी लोककथांचा वापर करण्यात येत असतो". [२]

लोककथा या आवड म्हणून निर्माण होत नसून, त्यांच्या माध्यमातून उपदेश देणे, नीतिशास्त्र शिकविणे, योग्य-अयोग्यतेची शिकवण देणे अशा विविध हेतूने लोककथांची निर्मिती झालेली असते.

३.३ लोककथांचे प्रकार

लोककथांचे अनेक प्रकार आहेत. दैवतकथा, परिकथा, उत्पती कथा, दंतकथा, प्राणी कथा,बोधकथा, हास्यकथा, विरकथा व अनुभवकथा

➢ दैवतकथा

ज्या कथा देवतांच्या संबंधित असतात त्या कथना दैवतकथा असे म्हणतात. दैवतकथा या प्राचिन कथा असून त्यांना पुराण कथा असेही म्हंटले जाते. या कथा धर्माशी संबंधित असतात. धार्मिक रूढी, वीधी त्या मगीलचे कारणे दैवतकथामध्ये दिसून येतात. देवदेवताचे जन्म त्यांचे अवतार सृष्टीची उत्पत्ती, रचना व त्यांचे कार्य शत्रू मित्र या इत्यादीचा दैवतकथा मध्ये आढळतात. नक्षत्रे, वनस्पती, चंद्र, सूर्य इत्यादी संबधीच्या कथाचाही सामावेश दैवतकथात होतो.

➢ उत्पतिकथा

मानवाच्या जन्म, सृष्टीची रचना, पुरुष व स्त्री भेद कसे निर्माण झाले या सगळ्याचे कारणे उत्पती कथेमध्ये येतात. या कथेचे स्वरुप काल्पनिक असते. मंत्राने एकादी स्त्री गर्भधारणा होणे किंवा आई वीणा मुलाचा जन्म होणे या सारख्या अद्भुतरम्य या कथा मध्ये आढळतात. तसेच या कथा मध्ये धर्मभावना निगडित असतात.

➢ दंतकथा

दंतकथा या ऐतिहासिक सत्य घटना असतात. ऐतिहासिक आख्यायिका असेही म्हणतात ऐतिहासिक व्यक्ती किंवा घटना या संदर्भात घडलेली कथा असते मौखिक परंपरेने कथाचे स्वरूप बदलते काही कथा एका स्थळाशी व्यक्तीशी वस्तूशी संबंधित असते. या कथातून तत्कालीन लोकचार, चालीरीती यांचे ऊलेख येत असतात.

➢ परिकथा

परिकथेला अद्भुत कथा असेही म्हणतात. कथेत पुरुष किंवा स्त्री मुख्य व्यक्ती असून त्या व्यक्ती भोवती अनेक प्रसंगाची चमत्काराची उभारणी केलेली असते. कथेची सुरुवात दुःखाने होवुन शेवट मात्र सुखाने होते. या कथेचे मुळ प्रयोजन मनोरंजन करणे आहे. संपुर्ण कथा गांभीर्ययुक्त असून त्यात अनेक अद्भुत शक्ती अतिमानवी चमत्कार असतात.

- बोधकथा

या कथा काल्पनिक असतात. हा लोककथातील अतिप्राचीन कथाचा प्रकार होय. त्यामागे कोणत्याही घडलेल्या घटनेचा आधार नसतो. तसेच कथेतून बोध दिला जातो. हुशार ससा, कासव व ससा या सारख्या कथांतून चागला बोध दिलेला दिसुन येतो. बोधकथेतली किंवा प्राणीकथेतील प्राणीसृष्टी ही पूर्णपणे लौकिक असते. हे प्राणी बोलतात चर्चा करतात मानवी जीवनातली निरनिराळे प्रसग यांचे प्रतिबिंब प्राणीकथेत दिसते.

- पराक्रमकथा

देशासाठी, राष्ट्रासाठी ज्यांनी बलिदान दिले त्याच्या पराक्रमाच्या आठवणी म्हणुन त्याच्या अनेक कथा निर्माण केल्या कौतुक करणे आठवण करणे अशा अनेक प्रेरणा मा कथेच्या निर्मिती मागे असतात.

- अनुभतकथा

या कथेत व्यक्ती आपल्या स्वताच्या जीवनात घडलेल्या घटनेवर कथा सांगतो व्यक्तीच्या जीवनातील अनुभवांवर आधारित कथा असते.

- प्राणीकथा

या कथा काल्पनिक स्वरूपाच्या असतात. तसेच कथेतून बोध दिला जातो. यात कथांना बोध कथा असेही म्हटले जातात .प्राणीकथा ह्या प्राण्यांवर अवलंबून असतात. प्राण्यांबद्दल मानवांना कुतुहल असते. त्यामुळेच त्यांचे स्वभाव, त्यांचे जीवन माणसाला कळू लागले. त्यातूनच प्राण्यावरील कथांची निर्मिती झाली. प्राणीकथा ज्या असतात त्या आकाराने लहान असतात. वाघ, कोल्हा, उंदीर, ससा, कासव अशा अनेक प्राण्यांवर लोककथा आहे. उदाहरणार्थ: आळशी ससा आणि हुशार कासव या कथेतून चांगला बोध दिलेला दिसून येते.

३.४ लोककथांचे विश्लेषण

१. सातजाणा भावाची एक भयण

या कथेत एक मुलगी आणि तिचे सात भाऊ आहेत. एके दिवशी ती लाकडे आण्यसाठी रानात जाते. तेव्हा तिला वाघ आपल्याबरोबर घेऊन जातो तो तिला खात नाही त्याला फक्त ती सुंदर दिसत होती म्हणून तो तिला नेतो. लाकड घेऊन बहीण अजून आली नाही म्हणून तिचे भाऊ तिला शोधायला जातात पण ती मिळत नाही. काही दिवसांनी ती मुलगी वाघाला सांगते की मला माझ्या भाऊची खूप आठवण येते. मी त्यांना भेटून येऊ? वाघ तिला सांगतो की तू जा पण पुन्हा येणार ना! तेव्हा ती हो म्हणते. वाघतिला तिच्या घरी सोडतो. ति चे भाऊ तिला पाहून म्हणतात की कुठे गेली होती. तेव्हा ती सगळे आपल्या भाऊना सांगते. काही दिवसांनी वाघ तिला न्यायला येणार म्हणून तिचे भाऊ घराच्या समोर एक मोठा गडा मरतात.वाघ तिच्या घाराकडे येतो आणि म्हणतो की “नरू मी तुला नेण्यासाठी आलो आहे” तेव्हा ती म्हणते वागोबा मी त्या गाड्यांमध्ये आहे तु तिथे ये वाघ उतरतो आणि वाघ तिथेच अडकतो त्याला वर यायला कळत नाही.

या कथेतून असे दिसते की या गावातील लोकांचा निसर्गाशी खोलवर नाते आहे. जळण आण्यासाठी या गावातील लोक जंगलावर अवलंबून असतात कारण तसेच त्यांच्या व्यवसाय जांगलाशी संबंधित आहे. या जमातीत जेवण चुलीवर बनवले जाते. जंगलाचा आणि या लोकांचा घनिष्ठ संबंध आहे. वाघ, कोल्हा इत्यादी जनावराची नावे त्याच्या तोंडावर आहे.या जनावराशी त्यांचा संबंध येतोच म्हणून त्यांच्या कथांचे कथानक या स्वरूपाचे असते. दैनदिनजीवन व्यवसाय यातून ही कथा सिद्ध झालेली आहे.

तसेच झाडाबद्दल व वेगवेगळया फुलांबद्दल व्यकतव्य केलेले आहे. ते एका वाक्यावरून दिसून येते. **“ जेन्ना आनळ आनी किनळ फुलतले तेन्ना आपुण तुका वरपा येतलो”** म्हणजेच वाघ मुलीला सांगतो की मी तुला फुल फुल्यावर न्यायला येईल म्हणजे ‘आनळ’ आणि ‘किनळ’ ही फुले फुल्यांनंतर न्यायला येईल. या लोकांना दिनांक माहीत नसते. तरी निसर्गात कधी काय होते त्यांना पक्के ठाऊक आहे म्हणून निसर्गाचा आधार घेत वेळ ठरवला जातो.

या कथेतून असे दिसून येते की या लोकांच्या मनात कुटुंबाविषयी एक प्रेमळ ओढ आहे. एकमेकांना सांभाळून घेण्यासाठी त्यांची तळमळ या कथेतून जाणवते.भावंडाचे प्रेम याकथेत त्या मुलीला जेव्हा तो वाघ घेऊन जातो .तेव्हा त्या बहिणीला लागलेली आपल्या भावाची ओढ ऐकणाऱ्यालाही रडवते. तो वाघ तिला सगळे काही चांगले खायला देत असतानाही तिला आपल्या भावाला भेटायला जायचे असे वाटते तिच्या भावाविषयी आलीपता उफाळून या कथेत आलेली आहे. तसेच भावांचा आपल्या बहिणीवर असलेला प्रेम कथेतून व्यक्त होतो.

पूर्वीच्या काळातील गरीबी या कथेत दिसते. "**आपल्याक हागा सामके बरे बरे खावपाक मेळटा न्हू**" या वाक्यावरून असे दिसत की त्या मुलीच्या घरात खाण्यापिण्याची सोय तेवढी चांगली नव्हती. या कथेतून असे दिसते की या लोकांना व्यवसायासाठीव उदरनिर्वाहसाठी जंगलावर अवलंबून राहावे लागतात.

२. आवाय आनी भुरगे

एक मुलगी असते तिची आई वारते. तिचे वडील पुन्हा लग्न करतो. पण तिची जी दुसरी आई असते ती त्या मुलीला चागली वागणूक देत नाही. तिला त्रास करते खायला अन्न देत नाही. काही वर्षाने तिला पण एक मुलगी होते पण ती दिसायला सुंदर नसते. अगोदरची मुलगी त्रास करत असल्यामुळें त्या मुलीला आपल्याला आईची खूप आठवण येते तिची आई एका किनाऱ्यावर पाण्यात पडून मेलेली असते. ती मुलगी त्या किनाऱ्याजवळ जाऊन रडू लागते आणि आपल्या मेलेल्या आईची आठवण कढून आपल्याला झालेला त्रास सांगते. चमत्कार होवून त्या किनाऱ्यातून तिला जेवणं मिळू लागते. हे सगळे तिच्या सावत्र आईला कळते ती आपल्या नवऱ्याला सांगते की समुद्रात असलेली कूली मला हवी तो तिला ती आणून देतो. त्या दिवसापसून त्या मुलीला जेवणं मिळण बंद होते. एक दिवस त्या मुलीला पाहण्यासाठी मुलाकडची लोक येतात तेव्हा ती सावत्र आई त्या मुलीला एका पिशवीत बांधून ठेवते आणि आपल्या मुलीला त्या मुलाला

दाखवते. पिशवीत असलेली मुलगी मोठ्याने गण म्हणू लागते आणि तिला पाहण्यासाठी आलेल्या मुलाला सगळे खरे काय ते कळते तो त्या मुलीला बाहेर काढतो आणि तिच्या मुलीला त्यात बंद करतो.

या जगात सर्व श्रेष्ठ म्हणजे स्वतःची आई – वडील दोघांमधील एक सुद्धा नसला तरी जगण्याची दिशा हरवून जाऊ शकते व जीवनात वेगवेगळया प्रकारचा त्रास होऊ शकतो हे सांगणारी कथा म्हणजेच कुळमी जमातीत सांगितली जाते.कथा ही जेव्हा आजी सांगत होती त्यावरून असे जाणवते की या गावात पूर्वीच्यकाळी मुलींना वेगवेगळया प्रकारचे त्रास सहन करावे लागत आणि त्यात भर म्हणजे जर कोणाची आई आणि बाबा नसेल तर त्या मुलाचे हाल होत असत.

या कथेत असे दिसून येते की पूर्वीच्या काळी मुलींना चागली किंवा वाईट हे त्यांच्या घरकमातील आवड या वर ठरवले जात होते.

या कथेत दोन प्रकारच्या नात्याचा उल्लेख केला आहे. ते दोन प्रकारचे नाते म्हणजेच सख्या आईचे नाते व सावत्र आईचे नाते. सखी आई जी आपल्या मुलीला आपल्या मरणोपरांत सुद्धा पोटभर जेवू घालते आणि सावत्र आई जी असून देखिल तिला वाढत नाही.

त्याच्या बोलण्यावरून असे जाणवले की सखी आई ही सखीच असते आणि सावत्र आई ही सखी बनू शकत नाही. पूर्वीच्या काळी अशा गोष्टी घडत होत्या म्हणूनच अशा कथाची निर्मिती झाली. माणसाचे व दर्याचे सुद्धा या कथेतून नाते दिसून येते. यावरून असे दिसते की ही लोक निसर्गातली घटकाशी जवळ आहे.

३. आब्याचे झाड

एका जंगलात एक आब्याचे झाड होते. त्याच जगलाच्या जवळ एक गाव होता. त्या गावात रामू नावाचा एक मुलगा राहत होता. तो नेहमी त्या आंब्याच्या झाडाजवळ खेळायला जायचा. तो मोठा

झाल्यावर त्या झाडाबरोबर खेळायला जायच बंद झाला. एक दिवस तो त्या झाडाजवळ येतो तेंव्हा झाड त्याला पाहून खुश होते आणि रामूला म्हणत की चल आपण खेळूया तेंव्हा रामू म्हणतो की मी लहान नाही आता तुझ्याबरोबर खेळायला मला खेळणी हवी पण माझ्याजवळ पैसे नाही. तेव्हा झाड त्याला सागत की माझे आबे वीक तुला पैसे मिळणार त्याची तु खेळणी घे. रामू तसाच करतो. पण परत तो त्या झाडाजवळ येत नाही. पुन्हा त्याला झाडाची गरज लागते . झाड त्याला पुन्हा मदत करत. रामू झाडालापुनः विसरतो. असच एक दिवस रामू म्हातारा झालेला असताना झाडाजवळ येतो. तेंव्हा झाड त्याला सांगत की माझ्या जवळ आता काहीच नाही तुला देण्यासाठी तेंव्हा रामू म्हणतो की मला आता काहीच नको माझी सगळी इच्या पूर्ण झाल्या. आता माझे पाय चालून धकले आहे. मला बसायला हवं तेव्हा झाड त्याला सांगत की तू माझ्या मुळापाशी बस तुला बरं वाटेल. रामू तसाच करतो झाडाच्या डोळ्यातून अश्रू येतात. मी माझ्या मित्राला शेवटी देखिल उपयोगी आलो.

हि कथा एक आब्याचे झाड व माणसाचे नाते यावर कथा आहे . या कथेतून अस जाणवतं की माणसाची वृती स्वतःच्या साध्या पूर्ती असते कारण या कथेत जे एक अब्याचे झाड आहे ते रामू नावाच्या माणसाला अगदी लहानपणापासून ते वृद्ध होई पर्यंत काही न काही देतच राहते.

यावरून अस जाणवतं की निसर्ग आणि निसर्गातील ही झाडे माणसाला कोणतीही अपेक्षा न करता सर्व काही देते. पण माणूस मात्र स्वतःचे काम झाल्यावर या निसर्गाला मात्र विसरतो.

या गावातील लोकांच्या मनात निसर्गाबद्दल असलेल प्रेम या कथेतून दिसते. कारण त्यानी अश्या कथा बनवल्या ज्या त्या आपल्या मुलांना सांगतात आणि त्यातुन मुलाच्या मानत निसर्गा बदल कृतंता निर्माण होते.

अस ही जाणवत की माणसाने कधी दुसऱ्याने केलेले उपकार विसरू नये. माणसाने नेहमी उपकाराची परत फेड केलीच पाहिजे असं नाही पण ज्यांनी आपल्यावर उपकार केलेले आहे त्यांना विसरू नये एवढं केल तरी माणुसकी जिवंत आहे अस या गावातील लोकांच्या बोलण्यावरून जाणवत.

या कथेतून नात्याबदल सुद्धा बोध घेता येतो. नात हे फक्त माणसां माणसातच नव्हे तर माणूस व निसर्ग याच्यात हि असू शकत हे या कथेतून जाणवत. या कथेत जेव्हा जेव्हा रामू दुःखी झाला तेव्हा तेंव्हा तो त्या अब्याच्या झाडापाशी गेला आणि आपली व्यथा अब्याच्या झाडाला सांगितली आणि जरी रामू त्या झाडापाशी काळा काळाने जात असला तरी त्या झाडाने त्याला झिडकारले नाही आणि त्याला जवळ करून त्याचे घालवण्याचा प्रयत्न देखिल केला.

यावरून अस जाणवतं की दुसऱ्याच्या दुःखाला दूर करण्यासाठी जरी स्वतःला थोडे कष्ट झाले तरी दुसऱ्यांची मदत करण्यापासून थोबु नये.

या कथेत मैत्रीचा पण एक बोध दिसुन येतो. अब्याच्ये झाड व रामू या दोघांमधील एक मैत्री दिसुन येते. अब्याचे झाड आपली मैत्री अगदी चोकपार पाडते पण रामू मात्र आपल्या गरजे पुरती त्या झाडाला मित्र मानायचा तरी सुद्धा ते झाड रामूला अगदी शेवट पर्यंत साथ देते.

तसेच या जगात देखिल मौत्रिला दोन स्वरुप असतात. एक स्वरुप म्हणजे शेवट पर्यंतची मैत्री आणि दुसरी म्हणजे गरजे पुरतीच मैत्री.

४. हुशार बाबलो

या कथेत असलेला मुलगा म्हणजे बाबलो आपल्या युक्तीने कश्या पद्धतीने आपला जीव वाचवतो ते दाखवले आहे. या सर्व गोष्टी पूर्वीच्या काळी मुलांच्या मनोरंजनासाठी घडवलेल्या होत्या अश्या या कथेतून मुलांना चतुराई व युक्ती या विषयावर संबोधन केले जात होते.

या गोष्टीत आणखी एक दिसुन येत ते पारंपरिक खाद्य आणि त्या खाद्याच आणि अजीच नात लहान पणी मुलांना ओढ असते ती आपल्या आजी – आजोबाची व त्यांच्या गोष्टीची आणि पारंपरिक खाद्याची या कथेत “ **पतोळी**” या नावाच्या पारंपरिक खाद्य दिसुन येत.

या कथेतून अस ही दिसुन येत की आदी मुलांना पतोळी या नावाचा गोड पदार्थ खूब आवडायचा. या गावातील कुळमी लोकाच्या मानत परंपरेसाठी व पारंपरिक जिन्यासासाठी आपुलकी दिसुन येते.

५. बामण आणि म्हारू

अस म्हणतात की जिथे देवाचे वास्तव असत तिथे दांवाच पण वास्तव असत. अश्याच एका विषयावर गावातली कुळमी लोकानी सांगितलेली कथा ती म्हणजे "**बामण आणि म्हारू**" या कथेत अस दिसून येत की या गावातील लोकामध्ये वेगवेगळया विषयावर एक विश्वास आहे ते विषय म्हणजे देव, भूत, खेत इत्यादी. पूर्वीच्याकाळापासून वेगवेगळया प्रथा पाळल्या जातात आणि त्या प्रथतून उत्पन्न झालेला विश्वास म्हणजेच त्याची भीती अस दिसून येत.

या कथेत अस सांगितल आहे की पूर्वीच्याकाळी लोकांना गृहस्ती चालवण्यासाठी घरदार सोडून दूर दूरच्या ठिकाणी जावे लागायचे. उत्पन्न चांगली नसल्यामुळे पोटभर जेवण सुद्धा मिळत नव्हत अस या कथेतून दिसुन येत.

पुर्वीच्याकाळी गावच्या आवाहारात वेगवेगळया प्रकारच्या शक्त्या वावरत अस असे ही दिसून येत. खरतर या कथा लहान मुलांच्या मनोरंजनासाठी घडवलेल्या होत्या पण त्या घडवण्यात सत्य घटनेचा आदार घेतला होता अस त्या गावचेलोक म्हणतात.

या कथेत एक बाप आपल्या मुला बाळा ना वडवण्यासाठी त्यांना पोटभर अन्न खावू घालण्यासाठी दूर गावी जाऊन कष्ट त्रास सहन करतो. अस दिसून येत. म्हणजेच वडिलांचं आपल्या मुलावरच प्रेम या कथेतून दिसून येत.

या कथेत " **म्हारू**" हा शब्द प्रयोग झाला आहे. हा शब्द एक विशिष्ट प्रकारच्या राक्षसाला संबोधित करण्यासाठी वापरला आहे. या गावातील असलेल गावपण या कथेतून दिसून येत कारण जेव्हा या गावातली

कोणत्याही व्यक्तीवर कसलीही वायट परिस्थिती आली तर या गावातील लोक मिळवून त्या वयाट परिस्थितीचा समाधान शोधण्यास एकत्र येतात.

दैवत कथा

रामनाथ

इथे वेर्ले गावाच्या रामनाथ देवा विषयी सांगत असताना रामाला रामनाथ असे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. तसेच लिंगाच्या स्वरूपात त्याला पूजले जाते. गावामध्ये त्या देवाची स्थापना कशी झाली हे कोणीही सांगितले नाही. पण गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार गावात शंकर स्वता कैलास पर्वतावरून आला व तिथे स्थापन झाला. तो कसा व का आला याची कोणाला माहिती नाही. रामनाथ हा त्या गावचा ग्रामदेव आहे. ग्रामदेव म्हणजेच गावचा रक्षण करणारा देव .

भाषिक अभ्यास

गोव्यातील एका टोकापासून तिसऱ्या टोकापर्यंत वेगवेगळया कोकणी भाषा वेगवेगळया पद्धतीने बोलली जाते टप्प्याटप्प्यावर नवीन नवीन शक्ती वापरली जातात गोव्याच्या खेड्या गावातील बोलली जाणारी व शहरात बोलली जाणारी कोकणी भाषा यांच्यात अंतर म्हणजे वापरले जाणारे पारंपारिक शब्द तसच कोळंब व वेर्ले या गावातील बोलली जाणारी भाषा ही शहरातल्या कोकणी पेक्षा वेगळे आहे. हे त्यांच्या कथेत वापरलेल्या भाषेतून दिसून येते.

कथा मध्ये असं पाहायला मिळतं की या लोकांनी पारंपारिक शब्द वापरणे पूर्णपणे सोडलेले नाही तरीसुद्धा काही ठिकाणी परप्रांती य भाषेचा परिणाम सुद्धा दिसून येतो म्हणजेच जेव्हा काही वस्तूची ओळख करून द्यावी लागत असे त्यावेळी कधी कधी इंग्रजीचे शब्द वापरले गेले आहे उदाहरणार्थ आयडिया इत्यादी. काही काही ठिकाणी भारतातील मराठी भाषेचा सुद्धा परिणाम दिसून येतो. या कथांमध्ये काही ठिकाणी असे

शब्द वापरले गेले आहेत. ज्यांची वाच्यता त्या गावातील लोकांना सोडून आणखीन कोणाला माहित असेल असं वाटत नाही. यापुरातन कथामध्ये जी कोंकणी भाषा वापरली गेली आहे आणि आजच्या कथांमध्ये जी कोकणी भाषा वापरली गेली आहे. त्यावरून असं दिसतं की कालांतराने कोकणी भाषेतील खूप परिवर्तन आलेले आहे. भाषेतील परिवर्तन फक्त कालांतराने नव्हे तर ग्रामीण भागातून शहरात झालेली लोकांचे वस्तीकरण आणि ते सुद्धा या लोकांच्या बोलण्यावरून परिवर्तन झालेले दिसून येते.

कोणत्याही कथा बद्दल लोकांच्या मनात आवड निर्माण करायची असेल तर कथेचा कथांनक चांगला असायला पाहिजे आणि या कथावरून अस दिसून येत की ज्याने कोणी ह्या कथा घडवली आहे. त्यांनी लोकांच्या भावना जाणल्या असल्या पाहिजे काही कथा अगदी सुरुवातीपासून शेवटपर्यंत ऐकत रहावे अशा वाटतात. सगळ्या कथांचा मूळ उद्देश समाज प्रबोधनासाठी आहे असं या कथेतून दिसून येते . कथच कथानक समाजातील घडामोडीवर, संस्कृतीवर परंपरेवर आधारित आहे. गूढ, रहस्य, थरारकत्ता, प्रेम ऐतिहासिकता स्त्री विशेषता या श्रेणीवर आधारित या सगळ्या कथा लिहिलेल्या गेलेल्या आहे. या कथांमध्ये लोकांच्या मनात आवड निर्माण करण्यासाठी कथानकाराने पात्र निर्मिती करताना लोकांच्या मनातील असलेल्या श्रद्धेचा व मुलांच्या मनातील असलेल्या उत्सुकतेचा पुरेपूर अभ्यास केला असावा असा या कथेतून दिसून येत.

या सगळ्या कथांमध्ये वास्तविकेचे आधार फक्त समाजप्रबोधन करण्यासाठीच घेतलेला आहे कारण जास्तीत जास्त कथेमधून जे पात्र व परिस्थितीचे घेतलेली आहे. ती आभासीक असून फक्त मनोरंजनासाठी वापरलेली आहे. या कथा वाचत असताना असं दिसतं की या कथा अगदी सत्य घटनेवर आधारित असल्या पाहिजे. कथेच्या सुरुवातीलाच मनात अशी उत्सुकता निर्माण होते की कथा पूर्ण पर्यंत कथा आयकविसी वाटते म्हणजेच कथेतील वातावरण निर्मिती उत्तमपणे पार पाडली आहे. जेंव्हा या कथा या गावातील लोक सांगत होते तेंव्हा त्याच्या मनात असलेली या कथेवरची भावना स्पष्टपणे दिसून येत होती .

कारण या कथेतील संवाद अशा प्रकारे रचले गेले आहे. तजणू ते प्रत्यक्षातच घडवलेली आहे. कोणत्याही कथेचे मूळ रूप व त्या कथेवरची रुची ही त्या कथेत वापरल्या गेलेल्या संवादावरून घडते कारण

म्हणजे वांचकाला व ऐकणाऱ्याला असलेला वेळ जर संवाद समजायला कठीण जात असेल तर त्या कथेवरची रुचीवाचकाच्या मनात राहत नाही. या कथामधून असं दिसून येतं की संवाद अगदी सोप्या भाषेत व वास्तविक भाषेत वापारण्याचा पुरेपूर पर्यंत केलेला आहे. या सर्व कथा समाजाला एका चांगल्या वळणावर आणण्यासाठी घडवल्या गेलेल्या असाव्या असं वाटतं कारण प्रत्येक कथेमधून काही ना काही समाजाला उद्देशून सांगण्यात आलेले आहे.

३.५ समारोप

लोककथा हा लोकजीवनातील सर्वात लोकप्रिय असा लोकवाङ्मय प्रकार आहे.या लोककथातून एखाद्या समाजाचे वैशिष्ट किवा एखाद्या गावाचे वैशिष्ट रूढी,परंपरा हे लोककथातून कथन केले जाते. या प्रकरणामध्ये कोळंब व वेर्ले गावातील लोककथाचे विवेचन केलेले आहे.एकंदरीत या सर्व कथा मनोरंजनपर असल्याचे दिसून येतात .तर काही निवडक दैवत कथा म्हणजेच रामनाथ ही दैवत कथा असलेली दिसून येते.

३.६ निष्कर्ष

१. जिथे जिथे लोक असतात तिथे तिथे लोककथा असतात.
२. लोककथामध्ये समजजीवनाचे आयाम दिसून येतात.
३. लोककथातून एका विशिष्ट गावाचे किवा देवाचा संस्कृतिक इतिहास सागीतला जातो.
४. लोककथा ही लोकजीवनाशी निगडीत असते.
५. लोककथातून परंपरा ,श्रद्धा, अंधश्रद्धा या सगळ्याचा प्रभाव लोकजीवनावर पडलेला दिसतो.

संदर्भ सूची

१. प्रभू देसाई उल्हास. 'गंगावळ्ळी पर्थगाळ्ळी नेत्रावळ्ळी शंखावळ्ळी', प्रकाशक कर्ता, प्रभू देसाई, उल्हास, टाकी शेल्डे, केपे गोवा, १ जानेवारी २००३६

२. वसईकर. ज्योनस व्हेलेंटाईन "वसई परिसरातील कोळी समाजाचे लोकसाहित्य एक चिकित्सक अभ्यास", मराठी विभाग मुंबई विद्यापीठ रानडे भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८ पृ क्र. 169,170

३. मांडे, प्रभाकर. " लोकसाहित्याचे स्वरुप." गोदावरी प्रकाशन औरंगाबाद,२०१७

……….………………….xxxxxxxxxxxxxx……….………………….

प्रकरण ४

कोळंब व वेर्ले गावातील कुळमी जमातीची लोकगीत

प्रस्ताविक 36

४.१ लोकगीत म्हणजे काय? 36

४.२ लोकगीतांच्या व्याख्या 37

४.३ लोकगीताचे स्वरूप 38

४.४ लोकगीतांच्या प्रेरणा 39

४.५ कुळमी लोकगीतांचे प्रकार 40

४.५.१ फुगडीगीते 40

४.५.२ धिल्लोगीते 46

४.५.३ लग्नगीते 49

४.५.४ शिग्मोत्सवातील गीते 52

४.६ समारोप 55

४.७ निष्कर्ष 55

संदर्भ सूची 56

कोळंब व वेर्ले गावातील कुळमी जमातीची लोकगीत

प्रस्ताविक

लोकगीतांची परंपरा ही फार प्राचीन काळापासून चालत आलेली परंपरा आहे. लोकसाहित्याचा एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ही मौखिक परंपरा होय. जेव्हापासून समाज अस्तित्वात आला तेव्हापासून लोकगीतांची परंपरा सुरु झाली असावी असे ढोबळ मानाने सांगण्यात येते. ‘लोक’ व ‘गीते’ यांच्यामध्ये एक अतूट नात्यांचे दर्शन लोकगीतांतून दिसून येते. गोव्यातील वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीची लोकगीते म्हटले जातात. वेगवेगळ्या विषय या लोकगीतातून मांडले जातात. लोकगीते माणसात असलेल्या वेगवेगळ्या समूहांना एकत्र आणण्याचे काम करतात. लोकगीते म्हणजेच पारंपारिक गीते ही गावातली असलेल्या पारंपारिकतेवर आधारित असतात. वेगवेगळ्या सणाना ही गीते ऐकायला मिळतात. लोकगीतांमधून गावातील असलेल्या संस्कृतीचे दर्शन घडते. ही गीते वेगवेगळ्या भाषेतून गायली जातात. सांगे तालुक्यातील कोळंब व वेर्ले या गावात देखील लोकगीतांची संपन्नता पाहायला मिळते. या अंतर्गत फुगडीगीते, धील्लोगीते, लग्नगीत, शिग्मागीते हे मुख्य प्रकार आढळतात.

त्याच्या या लोकगीतांतून आनंद, उत्साह, मस्करी या भावनाचे चित्रण होते. त्याचबरोबर जीवनातील दुःख किंवा संघर्षाला विनोदी ढंगाने सांगण्याची पद्धतही त्यांच्यात पहायला मिळते.

४.१ लोकगीत म्हणजे काय?

एक समाज गटातून निर्माण झालेल्या मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असलेल्या गीतांना लोकगीते म्हणतात. ती एक समूहातून उदयास येत असतात. त्यामुळे अभिव्यक्ती व संवेदनाचा प्रभाव पडतो. लोकगीते ही कालांतराने बदलते या संदर्भाना समावून घेत गीते आहे. लोकगीते प्रयोगशील असतात. लोकगीताचा निर्माता सांगता येत नाही. लोक स्वत:च्या मनोरंजनाचे, विधीचे साधन म्हणून गीतांकडे पाहतात.

लोकगीते बोलीभाषेत असल्यामुळें त्यातुन लोकजीवन आविष्कृत होते. बोलीभाषेवर प्रमाणभाषेचा बंधन नसल्यामुळे लोकगीतात जीवंतपणा असते. लोकगीते लोकसमुहाची समूदायिक अभिव्यक्ती असल्यामुळें समूहाच्या बोलितूनच ती साकार होत असतात . बोलीभाषेतून असल्यामुळें ती सर्वसामान्याच्या हृदयाला स्पर्श करतात. लोकगीताची भाषा साधी असते. ही भाषा लोकजीवनात प्रचलित असल्याने जीवंत वाटते. लोकगीते लोकजीवनात निर्माण होत असतात. त्यामूळे त्या प्रदेशातील बोलीभाषेचा प्रभाव लोकगीतावर दिसतो. बोलीभाषेला व्याकरणाचे नियम बांधू शकत नाहीत. शिवाय मौखिकत हे बोलीचे महत्वाचे वैशिष्ट्य लोकगीतांमध्ये दिसते.

४.२ लोकगीतांच्या व्याख्या

- अलेकझांडर क्रॉप

  " लोकगीत हे भावगीत असून लोकगीतांच उगम निरक्षरात होऊन त्याचा कर्ता अनामिक असतो. लोकगीतांची निर्मिती भूतकाळातील असून शतकांची परंपरा या गीतांना लाभलेला असते." [१]

- स . कृ . फडके

  " शास्त्रीय नियमांची विषेशही पर्वा न करता सामान्य लोकव्यव्हाराच्या उपयोगासाठी माणसे आपल्या आनंदाच्या उल्हासात ज्या वाणीचा सहज आणि छदोबद्द अविष्कार करतात ते लोकगीत समजावे."[२]

- व्ही. विल्यम्स

  " लोकगीत नवेही नसते आणि जुनेही नसते. वनातील वृक्षाप्रमाणे त्याची मुळे भूतकाळात खोलवर रुजलेली असतात. परंतु तिला नित्यनूतन शाखापुष्कळफळे येत असतात".[३]

४.३ लोकगीताचे स्वरूप

"लोकगीताचे स्वरूप सतत बदलत असते. त्यामुळे लोकगीते जुनेही नसते आणि नवही नसते. नव्यावर जुन्याचे कलम बांधण्याची क्रिया लोकगीतात विशेषकरून आढळून येते. लोकगीते नित्यनूतन अवतार धारण करीत असतात. लोकगीते काळाच्या ओघात नवीन अवतार धारण करीत असतात. गाणारा प्रत्येक गायक त्यात आपल्या नवीन शब्दांची भर घालीत असतो. गीतातील आशय हा परंपरागत चालत आलेला असला तरी नव्या प्रेरणांना अनुरूप अशीच शब्दांची योजना झाल्यामुळे, अभिव्यक्तीची त बदलल्यामुळे तो नित्यनूतन स्वरूपात अभिव्यक्त होतो. लोकगीतांचे स्वरूप प्रवाही असल्यामुळेच त्यात भाषेच्या बदलांना आणि निरनिराळ्या काळातील अनुभवविश्वाला स्थान असते. गीतांचे मूळ एकच असून निरनिराळ्या भाषांमध्ये त्यांची भिन्न-भिन्न रूपे दिसून येतात. शब्द बदलतात, पण आशय बदलत नाही; आशय तोच राहतो.

लोकगीतांचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. आशयाच्या दृष्टीने विचार केल्यास मानवी जीवनाचे एकही अंग असे नाही की ज्याचा आढळ लोकगीतात होत नाही. उद्दिष्टांच्या दृष्टीने लोकगीतांचा विचार केल्यास बहुविध उद्दिष्टांनी लोकगीते म्हटली जातात. मनोरंजन, श्रमपरिहार, सण, उत्सव, धार्मिक विधीचे एक अंग म्हणून भावाभिव्यक्ती, उपचार करण्यासाठी मंत्रोपचार, उपासना, लोकनृत्याला साथ, जीतिबोध इत्यादी अनेकविध प्रयोजने लोकगीतांची आहेत. रचनेच्या दृष्टीने विविधता येते. पाश्चिमात्य तसेच भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लोकगीतांच्या व्याख्या केलेल्या आहेत; तरी आशय, उद्दिष्ट व रचना यांच्या दृष्टीने लोकगीतांचे स्वरूप एका व्याख्येत सांगणे कठीणच जाते".[४]

लोकगीताची निर्मिती लोकसमूहात स्वाभाविकपणे होत असते. लोकगीत समाजजीवनाचा लोकमानसाचा सहज अविष्कार असल्यामुळे लोकगीताचा समाज जीवनाशी संस्कृतीशी अविभाज्य संबंध आहे. मानवाची भौतिक सृष्टी म्हणजे संस्कृती होय. लोकगीते मानवी भावभावनाचा उसळता उमाळाच असतो. मानवी भावभावना, लोकगीतामधून उमटलेले असतात. लोकगीत हे गाणे म्हणजे भावगीत, त्याला चाल असते. लोकगीताचा उगम निरक्षरांत झालेला असून त्याचा कर्ता अज्ञात असतो. लोकगीते त्या समाजाच्या बोली भाषेतच असतात.

४.४ लोकगीतांच्या प्रेरणा

1. विधी गीते

आदीम प्राचीन काळात मानवाला समाजात घडत असलेल्या घडामोडीतून अनेक चमत्कारिक गोष्टी जाणवल्या अशा गोष्टीच्या शोधात त्यांना समजले की अनेक घटनामागे अद्भुत शक्तीचा स्पर्श असतो. त्यामूळे त्या शक्तीला प्रसन्न करण्यासाठी विधी केली जावू लागली. त्या विधी मुक्याने करण्यापेक्षा काही उचार करावे व तिथून लोकगीते समोर आली. स्त्रिया आपल्या सुख दुःखाच्या गोष्टी या गीताद्वारे सांगण्यात येतात. तिच्यावर झालेला अन्याय ती सोसून राहते आणि आपल्या सासू सासऱ्या बद्दल, नणंद भावजय बद्दल, तसेच आपल्या नवऱ्या बद्दल आदरार्थी भावना व्यक्त करताना दिसून येत.

2. मनोरंजन

कष्ट करून आल्यानंतर श्रम हलके व्हावे व मनोरंजन उतम साधन या दुहेरी हेतूने गीत आली. तसेच विविध ऊत्सव सण अशा वेळी ही गीत म्हटली जातात. थोड्या वेळा करीता माणसाला चिंतन मुक्त करण्याकरिता आणि मनोरांजनासाठी या लोकगीतांचा फायदा होतो.

3. श्रमपरिहार

एखाद काम करताना एक ऊर्जा तयार व्हावी आळस येवू नये, त्याच बरोबर त्रास जाणवू नये, यासाठी स्त्री व पुरूष गाणी म्हणायची. त्यामूळे आनंदाने श्रम करता यावे. श्रम करताना स्त्रिया गीत म्हणतातच पण त्या बरोबर पुरुषही गीत म्हणताना दिसून येतो. या गीताच्या गायनाने कष्टही लवकर होत असते व श्रम ही जाणवत नसतो.

४.५ कुळमी लोकगीतांचे प्रकार

४.५.१ फुगडीगीते

फुगडी हा गोमंतकातील प्रसिद्ध असा स्त्रियाचा लोकनृत्य प्रकार आहे. गोमंतकातील सर्व सामाजिक स्थरातून स्त्रिया यात सहभागी होतात. फुगडी गीतामधून स्त्रियाचे जगणे आलेले आहे. ते जगणे लोकगीतांतून प्रतिबिंबित झालेले दिसून येते. फुगडी ही गणेश चतुर्थीच्या वेळी घालताना पाहायला मिळते. तसेच कोणत्याही सण- उत्सवाच्या वेळी फुगडी सादर केली जाते. याचबरोबर धिल्लो, धालो आदी माडांवर फुगडीचे सादरीकरण होताना दिसते.

फुगडी ही मुद्दाम कुणाला शिकवावी लागत नाही. ती आपोआप येते. फुगडीत अनेकजणीचा सहभाग असतो. सर्व घरातील स्त्रिया, मुली एकत्र येवून गोल वर्तुळात फुगडी खेळतात तसेच फुगडीचे अनेक प्रकारही खेळताना दिसून येतेता. यात पुरुषाचा सहभाग नसतो. हात आणि पायांच्या हालचालीने फुगडी सादर केली जाते. यात कुठल्याही वाद्याचा उपयोग केला जात नाही . हाताच्या टाळया मारून आणि गीत म्हणून फुगडी खेळतात. फुगडीच सादरीकरण होत असताना एक प्रमुख गाणारी स्त्री असते ती पहिल्यादा गीत म्हणते तीचे म्हणून जाल्यावर तिने गायलेले गीत पुन्हा अन्य फुगडी घालणाऱ्या स्त्रिया म्हणतात.

फुगडी ही गणेश चतुर्थीच्या दिवशी घातली जाते. त्याच प्रमाणे कुठ्ल्याही कार्याची सुरुवात देखील गणेशाच्या नावानेच केली जाते. तसेच फुगडीची सुरूवात सुधा गणपतीच्या नावाने करतात.

गणपती देवा करीन तुझी सेवा नमन करीन रे देवा नमन करीन रे

पाच फुलानी पाच फळांनी दुर्वा वाहिन रे देवा दुर्वा वाहिन रे

कपलाचो कुंकू तो जन्माभर आनी काय मागीन रे देवा आनी काय मागीन रे

या फुगडीगीतामध्ये स्त्री गणेशाला मागणी विनंती करते आपला कुंकू, गळयातला मणी, बांगड्या हे तिच्या सोबत कायम असू दे. हे सगळ सौभाग्याचे प्रतीक मानले जाते. या सर्व गोष्टी तिच्याकडे नेहमी राखून ठेवण्यासाठी ती गणपती समोर विनंती करते. आपल्या नवऱ्याचे दिर्घ आयुष्य लाभु दे असेही ती या गीताद्वारे गणपतीला प्रार्थना करते.

घरासमोर तुळस असल्यास कोणत्याही वाईट गोष्टी घरात प्रवेश करत नाही अस मानले जा जाते. प्रत्येक हिंदू धर्मामध्ये तुळस असणे हे महत्त्वाचे मानले जाते. तुळशीचे रोप पानान पान फुलावे अशी प्रत्येक घरातल्या स्त्रिची इच्छा असते. स्त्री आपल्या तुळशी मातेला ती आपले विचार, मनात असलेली दुःख, भीती ह्या सर्व गोष्टी सांगते.

दरातल्या तुळशी गे पानन पान

फुलशी गे पानन पान फुलशी

कपलाच्या कुकमासाठी कितनारी वनवासी गे

कितनारी वनवासी

दारातल्या तुळशी गे पानन पान

फुलशी गे पानन पान फुलशी

या फुगडीगीतातून अंगणातल्या तुळशीचे, सौभाग्याचे, स्त्रिचे वर्णन आल्याचे दिसून येते. एका स्त्रिचे जीवन तिच्या सौभाग्याशिवाय वनवासासारखे आहे. कुंकू , मणी नसणे म्हणजे तिचे सौभाग्य नसणेअसा अर्थ होतो. सौभग्या शिवाय जीवन जगणं आपल्या नशिबी येवू नये म्हणून ती तुळशीला याचना करते. अंगणातली तुळस हीच तिची दररोज सोबतीण असते. त्यामुळे दारातील तुळस ही नेहमी पानन पान फुलून राहावी अशी ही विनंती करते. अंगणातील तुळशिकडे सौभाग्याच मागते. दरातील तुळसच ही तिच्या सौभाग्याचे प्रतीक असते.

हातात भरला हिरवा चूडा

चूडा ग लग्नाचा हा चूडा ग लग्नाचा

नवरीन बाई उपास धरला

उपास ग हळदीचा हा उपास ग हळदीचा

आई माझी दोन दिवसाची सासू ग जन्माची

ही सासू ग जन्माची

उपरोक्त फुगडीमध्ये मुलीच्या मनाची व्यथा सांगितली आहे. जेव्हा एका मुलीचे लग्न ठरत तेंव्हा ती आपल्या मनाला सांगते किंवा समजावते की आपली आई, बाबा तेसेच घरातले सर्व हे सर्व आपल लग्न होईपर्यंत माझ्याभोवती असणार आहेत. लग्न झाल्यानंतर तिचा संसार मात्र सासू, सासरे, याच्या भोवती असणार आहे.

माडावयलो कीर तोच म्हजो दिर

मोरुलो साई मोरुलो

दुधावयली साय निच म्हजी माय

मोरुलो साई मोरुलो

या फुगडीमध्ये किराची उपमा दिराला दिलेली आहे. त्याचप्रमाणे दुधावयली साय असे सासूला म्हणते. किर म्हणजे एक पक्षी त्या पक्ष्यासारखा तिचा दीर आहे. तशेच यमक ही जुळवण्यात आले आहे. किर दिर, साय माय.

सीता गेली गे नयेच्या वळा सीता गेली गे नयेच्या वळा

सीतेन मेळेला धनुष्य बाण

सीतेन बाप्पाला साध केला

साध गेला गे वाऱ्याच्या नादान

सीतेने दुसरा साध केला

साध गेला गे बाप्पाच्या कानी

बाप्पा गुडगुड धावत आला

धुवे कसले संकट्ट घडले

धुवे दोवर गे तुळशीच्या पेडेर

तुळशी कांड गे प्रदक्षणा

तुळशी कर गे नमस्कार

तुळशी घाल गे लोटागण

या फुगडीमध्ये रामायणातील सीता व तिचा वडील जनक याचा उलेख आलेला आहे . सीतेला नदीच्या जवळ धनुष्य बाण मिळतो ती वडिलांना साध देते तो साध वाऱ्यात मिसळून जातो. दुसरा साध वडिलांच्या कानी जातो तो येवून तो बाण तुळशीपुढे ठेवण्यात सांगतो. सीतेला प्रदक्षिणा, नमस्कार, लोटांगण घलायला सांगतो. कुळमी लोकामध्ये असलेले संस्कार या फुगडी गीतात दिसून येतात.

भाषिक अभ्यास

गोव्याच्या संस्कृतीमधील असलेल्या लोकगीताच्या खजिन्यातील एक अमूल्य असा खजिना म्हणजे फुगडीगीते. गोव्यातील असलेल्या परंपरेचे दर्शन घडवते.हे गीते जास्तीजास्त कोंकणी व मराठी भाषेत म्हंटली जातात. तसेच या गावात देखील वेगवेगळ्या पद्धतीची फुगडीगीते गयाली जातात . या गाण्यामध्ये पारंपरिक भाषेचा जास्तीजास्त उपयोग केलेला दिसून येतो. गीतामध्ये यमक जुळवण्यासाठी शब्दांनी वेगवेगळा पद्धतीने गुंतूहून काव्याची रचना केली आहे .

या फुग्डीगीतमध्ये नात्यामधील प्रेम, राग, लोभ, ईर्षा याचे वर्णन करण्यासाठी वेगवेगळ्या व्यंगचे आधार घेतला आहे. लोकव्यवाराची भाषा वापरुन म्हटली गेल्यामुळे उटव्दार वाटत. अगदी सध्या व सोप्या चालीवर ही गाणी रचली गेली आहे आणि जे शब्द या गीतात वापरले गेली आहे ते त्या चालीला शोभून दिसतात. या

फुगडीगीतामध्ये निसर्गातील वेगवेगळया घटकांना त्याच्या मूळ भाषामद्धे म्हणजेच पुरातन कोंकणी भाषेमध्ये संबोधले गेले आहे.

फुगडी गीतातून दिसणारा निसर्ग

कुळमी जमातीच्या लोकांचा संबंध हा निसर्गाशी जास्त असल्याने त्याचा गीतातून निसर्ग हा मोठ्या प्रमाणात दिसून येतो. निसर्गाबद्दल या फुगडी गीतातून खूप काही दिसून येते. निसर्गातील वेगवेगळया विषयावर ही गीते आधारित आहे. मग ती आगणात असलेली तुळस असो ,बागेतील आंब्याचे झाड असो, जंगलातील वडाचे झाड, नदी डोंगर, जंगले व इत्यादी काही असो. निसर्गबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना जी काही भावना या स्त्रियांच्या मनात आहे. ती या गीतातून दिसून येते. या गीतातून असंही दिसून येत की या लोकांनी आपल्या जीवनाला निसर्गाशी पूर्णता जोडलेले आहे आणि हे तेव्हा पण दिसून येते जेव्हा एका गीतत तुळशीच्या झाडाला आपल्या सौभाग्याशी एका बाईने जोडलेले आहे.

एवढेच नव्हे तर निसर्गातील असलेल्या वेगवेगळया प्रकारच्या प्राण्यांशी सुद्धा या लोकांचे असलेले नाते त्या गीतातून दिसून येत. मग तो जमिनीवर सरपटणारा साप असो, फुला फुलावर उडणारी फुलपाखरे असो किंवा आभाळात उडणारे पक्षी असो या फुगडीगीतातून या वेगवेगळया प्राण्याचा उल्लेख आलेला दिसून येतो. प्रत्येक स्त्रिचे जीवन हे निसर्गाशी जुळलेल असत. ती आपले सुख दुःख निसर्गाशी व्यक्त करते. त्यामूळे फुगडी गीतातून निसर्ग हा मोठ्या प्रमाणात दिसून येतो.

कुटुंब दर्शन

या फुगडी गीतामधून या स्त्रियांच्या मनात कुटुंबाविषयी असलेली ओढसुद्धा दिसून येते. कुटुंबातील व्यक्ती म्हणजेच आई, वडील, भाऊ, बहीण यांच्यात असलेली नात्याबद्दलचा उल्लेख या गीतातून दिसून येतो. आईचा आपल्या मुलावर असलेल्या प्रेम भाऊच आपल्या बहिणीवरच प्रेम व लेखीच आपल्या वडिलावरचं प्रेम

या गीतातून वेगवेगळया तऱ्हेने दर्शविलेले आहे. जेव्हा भाऊ आपल्या बहिणीला सासरवाडी आणायला जातो व आई आपली लेख येणार म्हणून वेगवेगळया तऱ्हेचे खाद्यपदार्थ बनवते या संदर्भातलेली ही काही फुगडी गीते आहे.

एका स्त्रीचे आपल्या पत्नीवर म्हणजेच आपल्या सौभाग्यवर असलेलं प्रेम सुद्धा या गीतातून पाहायला मिळते. या गीतातून स्त्रीमध्ये असलेली मातृत्वाची बाजू दिसून येते एक स्त्री स्वतःबद्दल विचार न करता आपल्या कुटुंबाबद्दल किती भाऊक असते हे या फुगडीगीतातून जाणवते.

देव-देवता

फुगडी नृत्याचे धार्मिक भावनेचे संबंध आहे असे दिसून येते आणि ते संबंध फुगडी गीतातून दिसून येतो. या लोकांच्या मनातील देवां बद्दलची भावना व त्यांची असलेली निर्मळ श्रद्धा या गीतातील असलेल्या शब्दरचनेतून दिसून येते काही गीते अशी आहे ज्यामध्ये गाराणे घातले जाते व काही की गीते अशी आहे ज्यामधून देवाची स्तुती केली आहे तसेच काही गीतातून बायका गणपती देवाकडे आपल्या सौभाग्याचे रक्षणासाठी मागणी घालतात असताना दिसतात ते मागणे घालत असताना ती म्हणतात जर का देवाने त्यांच्या सौभाग्याचे रक्षण केले तर ती गणपतीला फळे व फुले देवाच्या चरणी वाहणार व गणपतीची सेवा जन्मभर करणार.

या फुगडी गीतातून या बायकांच्या मनात असलेली आपल्या कुटुंबाविषयी व सौभाग्य विषयी असलेली भावना दिसून येते व त्यांच्या देवावर असलेली विश्वाससुद्धा दिसून येतो .या फुगडी गीतामधुन पौराणिक कथेचा उल्लेखसुद्धा आलेला दिसून येतो. रामायण, महाभारत अशा महाकाव्यचा सुद्धा या गीतातून उल्लेख दिसून येतो. श्रीराम व माता सीता यांच्या बद्दल असलेली श्रद्धा या गीतातून दिसून येते. देवी देवतांनी गाजवलेल्या पराक्रमाची जाणीव सुद्धा या गीतामधून आलेल्या शब्द रचनेतून दिसून येते.

समाज -संस्कृती

फुगडी या गीतातून वेगवेगळ्या पद्धतीने समाज प्रबोधनसुद्धा केले आहे . समाजातील घडत असलेल्या विविध प्रसंगावर टिपणी करत काही फुगडी गीताचे शब्दरचना या गावातील लोकांनी केली आहे.या गीतामधून समाजाला वेगवेगळ्या विषयावर जागृत करण्याचा हेतू सुद्धा दिसून येतो. गोव्यातील ठीक ठिकाणी विविध प्रकारच्या संस्कृती पाहायला मिळतात जी लोकांनी वेगवेगळ्या माध्यमातून अगदी पुरातन काळापासून जपून ठेवली आहे. त्याच माध्यमातून एक माध्यम म्हणजेच फुगडी या गीतातून संस्कृतीची जाणीव सुद्धा दिसून येते पारंपारिक प्रथा व संस्कृती या गीताच्या माध्यमातून एका पिढीतून दुसऱ्या पिढीकडे पोहोचवले जाते.

४.५.२ धिल्लोगीते

धालोच्या समांतर असा हा कुळमी स्त्रियाचा धिल्लो हा लोकोत्सव होय. धिल्लो हा मांडावर खेळला जातो. या मांडावर एका बाजूला तुळशीवृदांवन असते. २१ दिवस हा धिल्लोत्सव खेळला जातो. धिल्लोत्सवात स्त्रियाबरोबर मुलीही सहभागी होतात. यात पुरुषाचा सहभाग संबंध नसतो. पहिल्या दिवशी सर्व स्त्रिया एकत्र एवून मातीची एक मूर्ती करून तिला डोळे, नाक, कान असे आकार देतात व गाणी म्हणून धिल्याला मांडावर तुळशीपुढे ठेवतात. त्यानंतर नमन करून बाकीच्या विधी करून गाण्याची सुरुवात केली जाते. २१ दिवस हे धिल्ल्याचे असतात. पाडव्याच्या दिवशी धिल्ल्याचे विसर्जन केले जाते. पण ज्या समाज्यात धिल्लो हा साजरा केला जातो त्या समाज्यात धालो हा लोकोत्सव साजरा केला जात नाही. २१ दिवस स्त्रिया व मुली एकत्र येवून हा धिल्लो खेळतात त्यावेळी फुगडी असे वेगवेगळे नृत्य खेळ खेळतात असे २१ दिवस चालत व शेवटच्या दिवशी धिल्याचे विसर्जन केले जाते.

धिल्ल्याला मांडावर हाणल्यावर नमन होते. या नमनात वेगवेगळ्या स्थानिक लोकदैवाचा उल्लेख येतो. त्याचा काही भाग असा आहे.

तोळूले आकेता बरयाळी शेळा

आदी नमन घालू आमी पुरसो देवा गे

तोळूले आकेता बरयाळी शेळा

आदी नमन घालू आमी घरवई माये गे

उपरोक्त गीतात गावातली वेगवेगळया देव- देवतांना, तसेच धरती मातेला नमन करून धिल्याची सुरुवात केली जाते.

आड्या वयले मेडयेर मिरया कितलो भार गे वो

जलम्या देवाचे पालके व सतऱ्या धिल्लो भार गे वो

सतरच्या धिल्लो भार

पाडी ये गे तोडी सुपारी

गणेसा देवा ग ये सोनेरी मुतारी गा सोनेरी मुतारी

उपरोक्त गीतात मिरी , सुपारी याचा उलेख आलेला आहे. कुळाघरात जे पीक पिकत त्याचा संबंध या गीतातून दिसून येतो. निसर्गाचे वर्णन आलेले आहे.

ताम्याची घागर मामान घेऊन दिलेली

कड्डडाची चिमोळ मामीन बानुन दिलेली

घागर आणि चिमोळ घेऊन सुन पाण्या गेलेली

धलत्या झुल्यार सुनेन पायो दिलेलो

पायो निसरलो घागर पडली

या लोकनृत्य त्यामध्ये वेगवेगळया तराची गाणी म्हटली जातात .या गाण्यांमध्ये निसर्ग, देवता, श्रद्धा संस्कृती या प्रकारचे विषय आढळून आलेले आहे.शेतकऱ्यानी उगवलेले पहिले पीक देवाला अर्पण करतानाची भावना या गीतातून मांडली आहे. गावातील आलेल्या तळाचे, विहिरीचे, पाट मधले निर्मळपाणी देवाला अर्पण करण्यामागची भावना सुद्धा त्यांच्या गीतातून दिसून येते. गावातील सुख समृद्धी राखून ठेवण्यासाठी देवाकडे केली जाणारी मागणी व त्या मागणी मागची श्रद्धा सुद्धा या गीतातून मांडली गेली आहे.

गावातील असलेली वेगवेगळे देव देवता यांच्या उल्लेख सुद्धा या गण्यातून आढळून येतो झाडांना, जंगलांना, वेगवेगळे जंगली प्राण्यांना सुद्धा दिलेली देवाचा दर्जा त्यांच्या धिल्लो या गीतातून आढळून येतो. वेगवेगळ्या पद्धतीने केली जाणारी देवाची आराधना या गीतातून स्पष्ट दिसते. गावातील असलेल्या ऐतिहासिक देवदेवताचे स्थान व त्यांची महिमा या गीतातून मुख्यरूपाने दर्शविले गेले आहे. पुरातन काळातून चालून आलेल्या संस्कृतीचा वारसा देखील या गाण्यातील स्पष्ट दिसून येतो. माणसाच्या आणि त्यांच्या सभोवती असलेल्या वातावरणाचा संबंध या गीतातून शब्दरचनेतून जाणवतो.या पारंपारिक नृत्यांच्या निमित्याने समाजातील लोक एकत्र येतात उत्सव साजरे करतात यावर सुद्धा टिपनी केलेली या गीतातून आढळते.

भाषिक अभ्यास

या गावातील पारंपरिक आणि संस्कृतिक नृत्य म्हणजे धिलो या नृत्यामध्ये गायली जाणारी गाणी मुखी रूपाने कोंकणी भाषेत जारी असली तरी या गाण्यामध्ये काही टिकणी मराठी भाषेतील शब्द जाण्याचा उलेख देखील दिसून येतो.या गाण्याची रचना करीत असताना समजतील असलेल्या वेगवेगळया वस्तूच्या नावाचा वापर केलेला दिसून येतो. गावातील असलेल्या देव-देवताचा नावाचा उलेख ही दिसून येतो.

या गीतामध्ये पारंपरिक कोंकणी भाषेतील शब्दाचा जास्तीजास्त शब्दाचा प्रयोग दिसून येतो.त्यासाठी सदरन शहरातील माणसाला या गीताचा अर्थ समजण्यासाठी कठीण जाऊ शकतो.

४.५.३ लग्नगीते

लग्न हा कौटुंबिक समारंभ जरी असला तरी तो सामाजिक पातळीवर महत्त्वाचा आहे. लग्न हा मानवी जीवनातील महत्वाचं भाग मानला जातो. स्त्री- पुरुष यांच्या जीवनाचा महत्त्वाचा असा सोहळा असतो. लग्न गीताना 'होवयो' असे म्हटले जाते. कौटुंबिक जीवनात हा आनंदाचा क्षण असतो. जीवनातील तो पर्वणीकाल मानला जातो. हे इच्छिलेले हे शुभकार्य निर्विघ्नपणे पार पाडावे म्हणून वेगवेगळ्या देवदैवतांची पूजाअर्चा होते .

हळदीच्या आदल्या दिवशी दळणकरण्याची पद्धत असते ती दळण करताना वेगवेगळी गीते म्हटली जाते. त्यातील एक गीत असे आहे.

दाते माणुन गे दात्या केल्या तिंबें

मानाने उभे गे वागरे देव

वागरे देवा गो वसो नाका पोयस

माणी मोडून बस तुज्या काऱ्यालागी

उपरोक्त गीतामध्ये दातं मांडून दात्याची पुजा केली जाते. दात्याच्या बाजूला व्हय केली जाते आणि तिर्थ सर्व देवांना बोलवल जात आणि त्या कार्याला बसून आशीर्वाद द्या याची प्रार्थना केली जाते .

आंबे, पणस मारून गे चिराय मोदेरा

घटा कडेला देवा बसकारे

गणेशा देवा ग वसो नाका पयस

कदेल घेऊन बस तुज्या कार्यालागी

या गीतातून आंब्याचे व फणसाचे झाड मारून देवाना बसण्यासाठी खुर्ची तयार करा असे सांगितले आहे. कसल्याही शुभ कार्याची सुरुवात ही गणपती देवाच्या मानाने केली जाते. तसेच या गीतात देखील गणपती देवाला

विनंती करताना दिसत की तुजच कार्य आहे तुम्ही दुर जाऊ नका आमच्या कार्यात खुर्ची घेऊन बस असे सांगितलेले दिसून येत.

आमच्या घरी कार्य म्हणोन गे शेजारा बोलाया

शेजारपण चलया ग माटवाक

आच्या घरी कार्य म्हणोन गे सयऱ्या बोलया

सयरे पण चलया ग माटवाक

उपरोक्त गीतात लग्नाचे कार्य आहे म्हणून सर्वांना आमंत्रण देवून बोलवा अस सांगितलेले आहे. तसेच या कार्यासाठी कोणाची गरज लागते त्यांनाही लावून त्यांचे काम करा अस सांगितलेले दिसून येत.

काश्याची गे वाट

लोकणाची गे बोली

आमोरेच्या पानान गे बाली नेसोयाली

कापसीणीच्या सुतान गे बोली बानया आली

हिंदू धर्मातील लग्न समारंभाला एक विशेष स्थान दिले गेलेले आहे. माणसाच्या आयुष्यात सर्वात मोते करी असा दर्जा लग्न समारंभाला दिला गेलेला आहे. पारंपरिक लगनमध्ये वेगवेगळ्या शास्त्राची सुरुवात ही लग्नाच्या दोन दिवशी आधी सुरू होते. ते म्हणजे दळण, हळद आणि नंतर लग्न दळण्याच्या दिवशी नवऱ्याच्या किवा नवरीच्या हातून जात्यावरील दळण काढली जाते आणि ते दळण काढताना गीते म्हटली जातात. ती म्हणजे लग्न गीते .

या लग्न गीतांना ओव्या असे देखील म्हणतात .या गावातील लोकांनी ज्या ओव्या सगितल्या त्यामधून आस दिसून येत की लोक संस्कृतीशी किती जवळीक ठेवून राहतात. दळण्याच्या दिवशी तांदळाचे दळण दळले

जाते हे एक गाण्याच्या कडव्यातून दिसून येते. या गीतातून आस दिसत की ही लोक अनामद्धे वापरल्या जाण्याच्या वस्तूचा देखील आपल्या संस्कृतीचे घटक मानतात म्हणूनच टीआर या गाण्यामध्ये तांदुळच्या, आब्याच्या ,फणसाच्या इत्यादि खादी वस्तूचा उलेख दिसून येतो.

या लग्नाच्या सोहळयात निसर्गातील असलेल्या मुख्य घटकाचा वापर ज्या ज्या पद्धतीने केला जातो त्या पद्धतीचा उलेख या गीतातून दिसून येतो.उदा :-कपासचा वापर, आब्याच्या पानाचा वापर, हळदी कूटचा वापर,चाफ्यचा वापर इत्यादि. या गीतमधून या लोकामध्ये कुटूबाविषयीची माया दिसून येते. या गीता मध्ये कुटुंबाला लग्न समारंभासाठी पाठवल्या जाणाऱ्या आमंत्रणचा देखील उलेख केला आहे. त्या पत्रिकाचा मानसुद्धा आगदी उचअसल्याचा या गीतातून दिसून येतो. देवाला वेगवेगळया पद्धतीने नमन करून लग्नकार्य सुखरूप पार पाडण्यासाठी मागणी केलेली दिसून येते. गावाच्या लोकाची श्रद्धा या गीतातून दिसून येते.

भाषिक अभ्यास

या गीतामध्ये मराठी व कोंकणी भाषेचे मिश्रण दिसून येते.काही टिकणी वस्तूची ओळख करून देण्यासाठी मराठी शब्दाचा प्रयोग केला आहे.या गीतामधून गावातील लोकामध्ये असलेल्या भाषेचे ज्ञान दिसून येते. पारंपरिक कोंकणी व त्यात वापरले जाणारे परांपरीक शब्द या गीतात खूब टिकणी पाहाला मिळतात. या गाण्यामध्ये कोणत्याही व्यागाचा वापर केलेला दिसून येत नाही. वाक्य एकदम सरळ व कोणत्याही प्रकारची मोडतोड दिसून येत नाही. तसेच गोमंतकत पोर्तुगीजानी राज्य केले असल्यासही काही पोर्तुगीज शब्दाचा वापर झालेला दिसून येतो. उदा :- कदेल इत्यादी

४.५.४ शिग्मोत्सवातील गीते

फाल्गुन महिन्यात होणारा हा लोकोत्सव होय. गावागावात हा खेळ खेळला जातो. गोमंतकातील प्रसिद्ध असा हा खेळ आहे. यात स्त्रियांचा सहभाग नसतो. हा खेळ वेगवेगळ्या तऱ्हेने खेळताना पाहायला मिळतात. यात पुरुष व मुले खेळताना दिसतात. वेगवेळ्या वाद्यचाही यात उपयोग केला जातो.ज्यात धोल, तासा, शामेळ अश्या तऱ्हेच्या वाद्याचा उपयोग होतो.

जो खेळणारा गट असतो त्याला मेळ असे म्हटले जाते. जो मेळ असतो तो प्रत्येक गावागावात अंगणात खेळतात. पहिल्या दिवशी जो मेळ असतो तो आपल्या वाड्याच्या मांडावर नमन घालतो. त्या दिवशी मेळाचे पुढचे सर्व दिवस ठरवले जाते. नमन घालताना ते सर्व देवदेवतांना आमंत्रण देऊन त्याच्या आशीर्वादाने या शिगम्याची सुरुवात करतात. तुमची कृपा आशीर्वाद सदैव आमच्यावर असू दे अशी मागणी करतात. त्या दिवशी ते कोणालाही काही अपशब्द म्हणू शकत नाही असे सांगीतले जाते.. मेळाला दुसऱ्या गावात जाण्यासाठी त्यांची एक ठरलेली वाट असते. त्याच वाटेने ते दुसऱ्या गावात खेळायला जातात. झाडाझुडपातून, डांबरी रसत्यावरून, रानातून ते जातात. नंतर मेळ हा होळीच्या आदल्या दिवशी आपल्या वाड्यावर पोहचतात व आपल्या वाड्यावरची घरे खेळून ते पुन्हा आपल्या मांडावर येतात. दोन्ही गावात अशीच पद्धत आहे.

त्याचप्रमाणे काही गीतेही साम्य असल्याचे दिसतात. जी गीते वेर्ले गावात म्हटली जातात तिच गीते कोळंब या गावात म्हटली जातात. उदा:- ‘पांडवांच्या राज्या रे कली पावल्या, अयोदे नगरी दशरथ राज्या बा’ अशी काही गीत आहे जी तशीच दोन्ही गावात म्हटली जातात. तर काही गीताच्या सुरुवातच्या दोन ओळी साम्य आहे पण पुढच्या ओळी वेगळ्या पद्धतीच्या आहे.

ॐ कारी या देवा ग नमन घालू

आनी पाताळीच्या अशेच ग राया नमन घालू

आनी गवतरे माये गे नमन घालू

आनी धर्तरे माये गे नमन घालू

आनी तुळसाई माये गे नमन घालू

या गीतात प्रत्येक देवांना नमन केलेले दिसून येते. कुठल्याही कार्याची सुरुवात ही गणपतीच्या आशीर्वादाने होते. त्याच प्रमाणे शिगम्याची सुरूवात देखील गणेशाच्या नांवाने होते. या गीतात ग'ॐकारी' देव असे म्हटले आहे. तसेच या भूमी मातेला वंदन केले आहे कारण तिच्या शिवाय काहीच करता येत नाही. निसर्गान निर्माण केलेल्या प्रत्येक वस्तूला नमनाच्या वेळी वंदन करुन त्याचा आशीर्वाद घेतला जातो. व नंतर त्याच्या गावातील देवदेवतांना नमन करुन त्याचा आशीर्वाद घेतला जातो.

सोड रे रावणा रामासीता

ना सोडीना राम लंके येता

उपरोक्त गीतत सीतेला रावण आपल्या लंकेत नेतो तेव्हा रावणाला सांगितले जाते की रामाच्या सीतेला सोड जर सोडणार नाही तर तुला मारण्यासाठी व आपल्या सीतेला नेण्यासाठी राम स्वता लंकेला येणार.

राम तुजो हनुमंत बळी रे

लंका जाळून केली होळी रे

वरील गीतात रामयणाच्या कथेचे वर्णन आलेले आहे. श्री राम, सीता, लक्ष्मण याच्याबरोबर असलेला श्री रामाचा भक्त म्हणजेच श्री हनुमान याचा उल्लेख आलेला आहे. श्री हनुमानाने जेव्हा लंका जाळली तेव्हा लंका जाळून तीची होळी केली असे म्हटले आहे. बळी रे, होळी रे अशा शब्दाचा वापर करून यमन जुळवलेले आहे.

या गावातील शिगमा गीतातून निसर्गातील असलेल्या सुंदर रचनेला शब्दा द्वारे काव्यात गुफले गेलेले दिसून येते. या गीतामध्ये वेगवेगळ्या पुरातन कथेचा उल्लेख सुद्धा आढळतो. हिंदू धर्मातील असलेल्या मोठमोठ्या काव्यातील म्हणजेच रामायण, महाभारत या काव्यातील घडामोडीवर आधारित काही गीताची रचना केलेली आहे. मग ते वनवासी जाणारे श्रीराम असो किंवा दुतंत हरणारे पांडव असो. रामाच्या मदतीला धावून येणारी ती खार असो किंवा द्रोपतीच्या रक्षणासाठी आलेला कृष्ण असो यांच्या आधारित रचलेली ही गीते आहे.

धर्म, युद्ध, नीती ,विजय ,पराजय यांचा देखील उलेख या गीतामध्ये आढळतो. काही गीते या गावातील आलेल्या राखणदार देवावर सुद्धा रचलेली आहे. या राखणदाराना नमन करत गावाच्या रक्षणासाठी केली जाणारी आराधना या गीतामध्ये आढळते. आपल्या कुळ देवा विषयी व गावातील ग्रामदेवता विषयी असलेली श्रद्धा त्यांच्या गीतामधून दिसून येते.

वेगवेगळया देवदेवतांचे किसे सुद्धा या गाण्यातून समाजातील लोकांमध्ये पोहोचवले जातात. या गाण्यातून विविध प्रकारच्या शास्त्राचे, संस्कृतीचे व मान्यताचे देखील दर्शन घडते.

त्या गीतामधून समाजाला प्रबोधन करण्यासाठी देवी देवतांचा उल्लेख केला आहे आणि त्यासाठी पूर्वीच्या काळी देवदेवतांनासुद्धा त्रास, अपेक्षा सहन करावी लागली यांचा सुद्धा उल्लेख या गीतातून दिसून येतो. एकीचे बळ व एकत्रि राहण्याची गरज यावरसुद्धा या गाण्यातून संबोधन केल जात. या गाण्यातून पूर्वी काळातील राज्या महाराजाचा सुद्धा इतिहास दर्शविला गेला आहे. युद्धात झालेला त्यांचा विजय पराजय पराजय यातून मिळालेली शिकवण यांच्यावर सुद्धा टिपणी करत या गीताची शब्दरचना केली आहे.

भाषिक अभ्यास

ही गीतात मराठी व कोंकणी भाषेचे मिश्रण आहे. या गीतामध्ये वापरले जाणारे भाषेचे शब्द पोराणिक कथेवर आधारित असतात.या गाण्यातील वापरलेल्या शब्दाचे दर्शन गावातील असलेल्या वाडवडीलच्या सावधात आढळून येतात. यमक जुळव्यासाठी शब्दांना वेगवेगळया पद्धतीने वळण दिलेले दिसून येतात.शब्दाची आळटपालता करून या गाण्याची रचना केलेली दिसून यते.

या गावात वापरल्या जाणाऱ्या मूळ भाषेचा वापर या गीतामध्ये जास्तीजास्त दिसून येतो. या गाण्यामध्ये परप्रतीय भाषेचा वापर जवळजवळ नाहीसा आहे कारण ही गाणी त्या काळापासून चालत आलेली आहे ज्या काळात परप्रतियचा वावर या लोकांच्या जवळ पास देखील नव्हता. या गीतातील काही शब्द हे खुब जुने असल्यामुळे त्याचा अर्थ लावणे काही लोकांना कठीण जाईल कारण हे शब्द आजकालच्या वापरल्या जाणाऱ्या कोंकणी भाषेमध्ये दिसून येत नाही. या गीतामध्ये पूर्वीच्याकली वापरल्या जाणाऱ्या शब्द आलेले आहे.

४.६ समारोप

या प्रकरणांमध्ये कुळमी जमातीच्या लोकगीताचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या लोकगीतामध्ये फुगडीगीते, धिल्लोगीते, लग्नगीते व शिगमागीते याचा समावेश आहे. या गीतातून त्याचे निसर्गशी संबंध रुढी परंपरा देवावरची श्रद्धा तसेच सभोवतालीच्या गोष्टी याचा समावेश कुळमी लोकगीता झालेला आहे .

४.७ निष्कर्ष

1. सांगे तालुक्यातील दोन्ही गावातील मौखिक परंपरातून येथील लोकसांस्कृतिक जीवनाच्या विविध पैलूंचे चित्रण आणि स्पष्टिकरण करतात.
2. दोन्ही गावातील लोकगीतातून त्याच्यात असलेली देवतांची श्रद्धा दिसते.
3. निसर्गाशी असलेल नाते लोकगीतांतून दिसून येत.
4. लोकगीतातून स्त्रियाच्या भावना व्यक्त झालेले आहेत.
5. कुळमी लोकगीतातून कौटुंबिक विषय आढळतात.
6. कुळमी जमातीतील आढळणारी गीते ही काव्यासौदर्य नटलेली आहेत.

संदर्भ सूची

१.मांडे, प्रभाकर. " लोकसाहित्याचे स्वरुप." गोदावरी प्रकाशन औरंगाबाद,२०१७ पृ क्र.227,228

२. तत्रैव

३. तत्रैव

४. वसईकर. ज्योनस व्हेलेंटाईन "वसई परिसरातील कोळी समाजाचे लोकसाहित्य एक चिकित्सक अभ्यास", मराठी विभाग मुंबई विद्यापीठ रानडे भवन, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८ पृ क्र.85

५. प्रा,जाधव संध्या. "स्त्री लोकगीतातील अंतरंग", प्रकाशक :नीता श्रीराम गव्हाणे, सूर्यमुद्रा प्रकाशन, भूमी,३,यशनगरी, तिरुमलानगर, नांदेड

……….…………………xxxxxxxxxxxxxx……….…………………

प्रकरण ५

कोळंब व वेर्ले गावातील कुळमी जमातीची लोककथागीत

प्रास्ताविक **58**

५.१ लोककथागीत **58**

५.२ लोककथागीता विश्लेषण **59**

५.३ समारोप **63**

५.४ निष्कर्ष **63**

संदर्भ सूची **64**

कोळंब व वेर्ले गावातील कुळमी जमातीची लोककथागीत

प्रास्ताविक

या प्रकरणामध्ये कोळंब व वेर्ले गावातील कुळमी जमातीची लोककथागीत अभ्यास करण्यात येणार आहे. लोककथा गीत म्हणजे एखादी कथा गीताच्या माध्यमाने सादर केली जाते. या कथा कुठल्याही प्रकारच्या असतात उदाहरणार्थ अद्भुत कथा ,दैवत कथा दंतकथा उत्पत्ती कथा प्राणी कथा इत्यादी लोक्कथागीत हया काही गावात सणाच्या दिवशी सांगीतल्या जातात तर काही गावात त्या कुठल्याही दिवशी सांगीतल्या जातात त्याला विशेष काळ किंवा विधि लागत नाही. वेर्ले आणि कोळंब अश्याच प्रकारे सादर केल्या जातात कुठल्याही विधी किंवा सणाच्या दिवशी गायल्या जात नाही. त्या कधीही सांगीतल्या जातात आणि या गावातील लोककथागीतांचे संकलन करून त्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

५.१ लोककथागीत

"लोककथागीतासाठी इंग्रजीमध्ये 'बॅलेड' ही संज्ञा वापरली जाते. गीताद्वारे सांगितली जाणारी कथा म्हणजे 'लोककथागीत' असे म्हणता येईल. लोककथागीत मौखिक परंपरेने चालत आलेले असते. त्याचा निर्माता अज्ञात असतो. कोणातरी एका व्यक्तीने या गीताची रचना केलेली असली तरी कालक्रमात त्याचे नाव गळून पडलेले असते. रचनेत रचनाकाराच्या व्यक्तित्वाचे प्रतिबिंब नसते, त्यातून सामुहिक भावनेचा आविष्कार झालेला असतो. लोककथागीते वाद्यसंगीतासह नाचून साभिनय सादर केली जातात. सादरीकरणाचे स्वरूप सामुहिक असते. ही कथा रात्ररात्रभर सांगितली जाते.

कथेची लांबी प्रदीर्घ असली तरी आवश्यकतेनुसार लोककलावंत त्यात काटछाट करीत असतो. त्यामुळे लोककथा गीताचा अमुक एक पाठ मूळपाठ आहे असे म्हणता येत नाही. भर घालणे आणि काटछाट करण्याची प्रक्रिया लोककथागीतांमध्ये अखंडपणे सुरू असते. धृवपदांची पुनरावृत्ती झाल्याने कथागीताला लय

प्राप्त होत असते. लोककथागीत मौखिक असते. त्यात सर्वसामान्य नायकाचे चित्रण केलेले असते. रचनाविष्कारात स्वाभाविकता असते. अभिव्यक्तीमध्ये मुक्ततेचे तत्त्व असते".[१,२]

थोडक्यात लोककथागीतांच्याबद्दल असे सांगता येईल की लोककथागीत हे लोकसमूहात मौखिक परंपरेने चालत आलेले कथात्मक लोकगीत असते.

१) लोककथागीत गेय असते.

२) ते कथात्मक असते.

३) त्याचा रचनाकार अज्ञात असून त्याचा रचनाकालही अज्ञात असतो.

४) निर्मात्याच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यात अभाव असतो.

५) ती मौखिक परंपरेने लोकसमूहात चालत येतात.

६) सामुहिकता हा त्याचा एक विशेष असतो.

७) लोककथागीते साधी आणि अनलंकृत असतात.

५.२ लोककथागीता विश्लेषण

या गावातील लोकांमध्ये असलेल्या आणखीन एक कलेचा प्रकार दिसून तो म्हणजे गाऊन सांगणारी कथा ज्या कथा गाण्याच्या माध्यमातून सांगितल्या जातात. वेगवेगळे सूर कधी यमक तर कधी शब्दकोडे वापरून या गाऊन सांगणाऱ्या कथा सांगितल्या जातात.

दोगे चोवगे मेलोनी ये रानी वनी गेल्यो

रानी वनी गेल्यो रे पुत्रा रानी वनी गेल्यो

रानी वनी वाचोनी कोडू पुनाईलो

कोडु पुनाईलो रे पुत्रा कोडु पुनाईलो

कोडु पुनावन घरात्यो येईल्यो घराशो येईल्यो रे पुत्रा

गावातील असलेल्या एका आजीने अशीच एक कथा सांगितली ती म्हणजेच कृष्ण पुत्राची. या कथा गीतामध्ये लोकापर्यंत सदविचार पोहचविले जातात. तसेच या कृष्ण पुत्राच्या कथा गीतामध्ये असं दिसून येत की लोकांच्या मनात नात्याबद्दलचे भाव अगदी प्रामाणिक व निर्मळ आहे.

या लोकांचा स्वभाव या कथागीतातून दिसून येतो.या कथागीता मधून असं दिसून येतं की पूर्वीच्या काळी लोक औषध उपचारासाठी निसर्गावर अवलंबून असायची. औषध उपचारासाठी वेगवेगळया मुळांचा, वेलीचा, पानाचा, झाडांचा उपयोग होत असे या कथगीतातून दिसून येत. या कथागीतामध्ये आई व बाळामध्ये जे असंख्य प्रेम आहे ते दर्शविलेली आहे. आई आपल्या मुलासाठी कोणकोणत्या प्रकारची कष्ट घेऊ शकते यावर चर्चा देखील या कथागीतामधून केलेली दिसून येत.

पूर्वीच्या काळी लोक मुलांना कशाप्रकारे औषध पाचवत असे हे दिसून येत. आई मुलाचे प्रेम हे श्रीकृष्ण याच्या कथेचा वापर करून ही कथागीत रचले गेलेले आहे हे दिसून येत म्हणजेच देवी देवता विषयी यांच्या विषयी असलेली श्रद्धा जाणवते. यशोदा मायी व कृष्ण यांच्या मातृत्व प्रेमावर आधारित असलेले ही कथागीत दिसून येत. पुत्र विराहाने आईची होणारी तळमळ व तिला होणाऱ्या यातना या कथा गीतातून दर्शन दिले आहे. आई जिवंत असताना तिच्या पुत्राला चीतेवर अंतिम क्रिया करण्यासाठी झोपले जाते ते दृश्य पाहून आईला होणाऱ्या यातना तीच्या मनाची झालेली हालत या कथागीतातून दिसून येत. कृष्णाची लीला या कथागतातून जाणवते.

माझ्या पद्मावती धुये गो

माझ्या पद्मावती धुये म्हु

तुका फुलास भार नाही ग

तुका फुलास भार नाही म्हु

तुका वेगळोस भार जाला गो

या कथागीतमध्ये आधी कथा सांगितली मग त्यावर आधारीत म्हणजेच कथेचा पुढचा टप्पा गावुन सांगितला. या कथागीतांमध्ये इतिहासातील काल्पनिक कथेबदल या लोकाच्या मनात असलेली आवड दिसुन येते. यात सामजिक विषयावर संबोधन केलेले दिसुन येते. या कथागीतामध्ये एतीहासिक पात्राचा वापर करून समाजातील प्रियकर व प्रियसी यांच्यामध्ये असलेल्या प्रेमाचे चित्रण या कथागीता द्वारे सागितले गेले आहे.आई-वडिलांच्या मनात असलेली आपल्या मुली व मुला विषयीची काळजी ही यातुन दिसून येते.

यातुन अस दिसून येत की माणूस व देव यांच्यामध्ये असलेल भक्तीच नात दिसून येत. तसेच यामधून अस दिसत की देव आपल्या भक्तासाठी कधीही कोणत्याही रुपात धावून येवू शकतो. या लोकांचा मनात असलेला देवावरचा विश्वास व देवावरची श्रद्धा दिसुन येते. यात श्री हरी आपल्या भक्तांच्या घरी येतो व भोजन करतो हे दर्शविले आहे. लोकाची देवावरची भोळी माया दिसुन येते.

भाषिक अभ्यास

गावातली असलेल्या वेगवेगळया उत्सवी किंवा घरातली वडीलधारी आपल्या नात्वनडला या कथागीत सागत असतात. या कथागीतामध्ये या गावात वापरल्या जाणाऱ्या कोंकणी भाषेचा प्रयोग दिसुन येतो. वस्तूची ओळख करून देण्यासाठी काही ठिकाणी मराठी भाषेचा सुद्धा प्रयोग केलेला आहे. या कथागीतांमध्ये यमकाचा वापर कवचित दिसुन येतो. काही कथा मराठी व कोंकणी भाषेचे मिश्रण करुन सांगीतल्या आहे. या कथागीतांमध्ये जुन्या शब्दाचा उपयोग झालेला दिसुन येतो. उदा:- बोतुशी इत्यादी

एक आशिल्लो उंदीर मामा ‘हुंऽऽ हुं ऽऽऽ‘

कणेरीर बसून तो कणेर खातालो हुंऽऽ हुं ऽऽऽ‘

कणेर खात खाता काट तोपलो

दाडी करतालो म्हालो माम

अग अगा म्हाल्या मामा

हाड तुजो वाकोर काड म्हजो काटो

काटो मोडल्यार वाकोर व्होरतोलों

लहान मुलांना झोपण्यासाठी किंवा त्यांच्या मनोरंजनासाठी हे लोककथागीत त्यांना म्हणून दाखवले जाते. या लोककथागीताच्या प्रत्येक ओळीनंतर हुं हुं हुं असा एक आवाज काडून पुढची ओळ म्हंटली जाते. हे कथागीत एका उदराच आहे. त्याच्या पायाला काटा टोचतो तो काटा कण्यासाठी एका न्हाव्या कडे जातो त्याला सांगतो की काटा काढत असताना जर मोडला तर तो त्याची एक वस्तू घेवून जाणार अस करत तो खूब लोकांना भेटतो त्यांची वस्तू घेवून जातो व शेवटी एका शेनाई वाजवत असतो त्याला भेटुन त्याची शेयनाई घेवून झाडावर बसतो ती वाजवीत कोणा कोणा कडून काय काय मिळवले हे गातो.

या कथागीतात आलेला उंदीर आपल्या हुशारीने लोकांना फसवून कश्या प्रकारे वेगवेगळी वस्तू मिळवतो. तसेच वेगवगळया समाजातील असलेल्या लोकांचें वर्णन या कथागीतातून आलेले दिसुन येते. त्यांचे वस्तू बनवन्याचे काम धंदे याच्या ही उलेख या कथागीतातून केलेला आहे.

५.३ समारोप

एकंदरीत या प्रकरणमध्ये वेर्ले आणि कोळंब गावातील लोककथा गीताचा अभ्यास करण्यात आलेला आहे. एकंदरीत या गावातील लोक कथा गीत घ्या दंत कथा असल्याचा आढळून येतात. याचे विश्लेषण या प्रकरणामध्ये करण्यात आलेले आहे.

५.४ निष्कर्ष

1. लोककथागीताचा कर्ता अज्ञात असतो.
2. मौखिक परंपरेने समाजजीवनात चालत आलेली असतात.
3. गांभीर्य अश्याने लोककथागीते भरलेली असतात.
4. लोककथागीतात चरणाची पुनरावृती असते.

संदर्भ सूची

१. मांडे, प्रभाकर. " लोकसाहित्याचे स्वरुप." गोदावरी प्रकाशन औरंगाबाद,२०१७ पृ क्र. 257

२. रुपबंधांचे स्वरुप पृ क्र.१५

३. कुलकर्णी, दिनकर. "मराठी लोककथागीत" प्रकाशन गोदावरी,प्रकाशन मंगल प्रभा औरंगाबाद

………..…………………xxxxxxxxxxxxxx………..…………………

प्रकरण ६

कुळमी जमातीचे इतर संकिर्ण लोकवाङ्मय

प्रस्ताविक 66

६.१ म्हणी 66

६.२ वाक्प्रचार 72

६.३ समारोप 77

६.४ निष्कर्ष 77

संदर्भ सूची 77

कुळमी जमातीचे इतर संकिर्ण लोकवाङ्मय

प्रस्ताविक

प्रत्येक समाजात सर्व जाती, धर्माच्या लोकांमध्ये म्हणी, वाक्प्रचार आहे. प्रत्येक व्यक्तीच्या बोलण्यातून म्हणी, वाक्प्रचार येताना दिसतात. लोकांच्या मौखिक परंपरातील आणि भाषेतील एक महत्वाचे अंग म्हणून म्हणी व वाक्प्रचार यांचा विचार केला जातो. 'कोळंब' व 'वेर्ले' गावातील लोकभाषेतही या म्हणी व वाक्प्रचार आढळतात. 'म्हण' व 'वाक्प्रचार' हे एकदा प्रचारात आल्यानंतर बाकीचे लोक नंतर स्वीकारतात म्हणीतून आणि वाक्प्रचारतून जीवन आणि संस्कृती विषयी माहिती मिळते.

म्हण, वाक्प्रचार हे कमी शब्दात खूप काही सांगून जातात. समाजाला शिकवण दिली जाते. प्रत्येक वाक्प्रचार माध्मातून काहीह तरी सांगायचे असते. मोठा आशय यातून व्यक्त केला जातो.म्हणी, वाकप्रचाराची भाषा ही अनौपचारिक स्वरूपाची असते.एखाद्या विशिष्ट भाषेतून माणूस दैनदिन व्यवहार करत असतो आणि विशिष्ट भाषा म्हणजे बोली भाषा या बोली भाषेतून सहज एकमेकाशी संवाद साधून व्यवहार करत असतो. या बोलीमध्ये म्हणी, वाक्प्रचार अगदी सहजपणे येत असतात. शिकलेल्या लोकांबरोबर अशिक्षित लोकही म्हणीचा, वाक्प्रचारचा वापर करतात. म्हणी व वाक्प्रचाराचा वापर केल्यामुळे भाषेला सौदर्य प्राप्त होते. तसेच बोलण्यातुन माणसाचा समोरच्या व्यक्तीवर चांगला प्रभाव पडतो.

६.१ म्हणी

म्हण म्हणजे अनुभवाच्या खाणी असे म्हटले जाते. म्हणीचा उगम कधी झाला हे सांगता येत नाही. पण भाषेच्या जन्माबरोबरच म्हणीचा जन्म झाला असावा असे म्हणता येते. माणसाने अनुभवलेल्या काळनुकाळ अनुभवाचे स्पष्ट चित्रण म्हणीमध्ये दिसून येते.भाषेला सौदर्य प्राप्त करून देण्यासाठी म्हणीचा वापर महत्वाचा असतो. म्हणीमध्ये एक प्रकारचे काव्य दडलेले असते म्हणून ते लगेच लक्षात राहते. दैनदिन जीवनात माणूस हा म्हणीचा वापर सहजतेने करत असतो.लोकांच्या चांगल्या,वाईट प्रवृती ,विचार इत्यादीची यातून प्रतिबिबित करत असतो.

नाते संबंधावर आधारित म्हणी

१. ‘कामा पुरतो मामा’

जो पर्यंत एखाद्याची गरज असेल तोपर्यंत तिच्याशी गोड, प्रेमाने वागणे. काम झाले किंवा गरज संपली की त्या व्यक्तीशी कोणताही संबंध ठेवला जात नाही.

२. ‘बापूय तसो पुत’

एखादा मुलगा जर त्याच्या वडील सारखा वागत असला तर त्याला ही म्हण म्हटली जाते.

३. ‘आई जवण घालीना आनी बापूय भीक मागु दीना’

एखाद्या कठीण प्रसंगात सर्व बाजूने माणूस अडचणीत सापडला तर कोणत्याच बाजूने मार्ग निघू शकत नाही . अर्थ - घरात आई जेवण करून वाढू शकत नसेल आणि वडील भीक मागू देत नाही.

निसर्गावर आधारित म्हणी

लोकजीवनाचा सर्वांत महत्वाचा भाग निसर्ग म्हणजे होय. माणूस हा निसर्गाच्या भोवती वाढलेला असतो. त्यामूळे लोकांच्या बोलण्यातून, भाषेतून निसर्गाभिवक्ती प्रतिकाचा सामावेश होणे हे स्वाभाविक आहे. म्हणीतही निसर्गाचे वर्णन आलेले आहे.

1‘ आंवाळ दिवन कुंवाळ काडप’

याचा अर्थ असा की आपले थोडेसे देवून दुसऱ्याचा खूप फायदा करुन घेणे किंवा आपण काही छोटीशी वस्तू देवून मोठ्या वास्तूची अपेक्षा करणे.

२.‘ चींच म्हातारी जाली म्हण आमसाण कमी जायना’

जेव्हा म्हातारी माणसे काही सल्ला देतात पण त्याचे कोणाला ऐकून घ्यायचे नसते आपले तेच खरे करायचे असते.

